सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा; महाराष्ट्राच्या लोककलेचा देश-विदेशात व्यापक जागर

**मुंबई :** गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानिमित्त महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा राज्याच्या सीमांपलीकडचे देश-विदेशातील रसिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित 'लोककलेतील श्रीगणेश' या उपक्रमांतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांसह देशातील विविध राज्यांत, नवी दिल्लीत आणि दुबईत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

देशातील विविध राज्यांमधील सादरीकरणे

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी देशातील विविध प्रमुख शहरांत खास कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे:**

**देहरादून (उत्तराखंड):** १६ सप्टेंबर रोजी इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी येथे पारंपरिक ढोल-ताशा वादन.

**जम्मू (जम्मू-काश्मीर):** १८ सप्टेंबर रोजी पद्मश्री पद्मा सचदेव शासकीय महाविद्यालय सभागृहात लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य आणि गायन.

**चेन्नई (तमिळनाडू):** २० सप्टेंबर रोजी कृष्णा गणा सभा येथे नमन, गण, जाखडी, मंगळागौर, आदिवासी, धनगरी, कोळी नृत्य आणि जागरण-गोंधळ.

**सिल्वासा (दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दीव):** २१ सप्टेंबर रोजी कला केंद्रात लेझीम, गण-गौळण, बाल्या नृत्य आणि शास्त्रीय नृत्य.



**लखनऊ (उत्तर प्रदेश):** २१ सप्टेंबर रोजी राय उमानाथ बली प्रेक्षागृहात गणेश वंदना, ओवी, मंगळागौर, गोंधळ, भजने आणि संगीतमय नृत्यनाट्य.

**कोटा (राजस्थान) आणि अमरावती (आंध्र प्रदेश):** २२ सप्टेंबर रोजी अनुक्रमे अहिल्याबाई होळकर सभागृह आणि वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पारंपरिक लोककलांचे सादरीकरण.

**कोलकाता (पश्चिम बंगाल):** २२ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र निवासातील टिळक हॉलमध्ये स्तवन, गीतरामायण, कोळीगीते आणि देशभक्तीपर गीते.

**हैदराबाद (तेलंगणा):** २३ सप्टेंबर रोजी भारतीय विद्या भवन येथे 'महा गणेशोत्सव' अंतर्गत विशेष सांस्कृतिक कार्यक्रम.

नवी दिल्लीत कला-संस्कृतीची मेजवानी

राजधानी नवी दिल्लीतही १५ ते २३ सप्टेंबर दरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये १५ सप्टेंबर रोजी भरत जाधव यांचा 'सही रे सही' नाटक प्रयोग, १७ सप्टेंबर रोजी वैभव जोशी व संदीप खरे यांचा चित्रपट गीतांचा कार्यक्रम, १८ सप्टेंबर रोजी संतोष भांगरे यांचे लोककला सादरीकरण, २० सप्टेंबर रोजी वैशाली सामंत व सहकाऱ्यांचा संगीत कार्यक्रम आणि २३ सप्टेंबर रोजी प्रमिला लोदगेकर यांच्या सादरीकरणातून लावणी परंपरेचा जागर केला जाईल.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता स्विस इंटरनॅशनल ऑडिटोरियम येथे 'लोककलेतील श्रीगणेश' कार्यक्रम होईल. यात नमन, गण, जाखडी, मंगळागौर, कोळी व धनगरी नृत्यांचे सादरीकरण केले जाईल.

राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच मुंबईकरांसाठी १७ ते २४ सप्टेंबर दरम्यान 'गणेशोत्सव २०२६ शास्त्रीय संगीत महोत्सव' रवींद्र नाट्य मंदिराच्या मिनी थिएटरमध्ये दररोज सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. यात सुभद्रा देसाई, एस. आकाश, मेहताब अली नियाझी, धनंजय हेगडे यांसह अनेक नामवंत कलाकारांचे गायन व वादन होणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सचिव किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम होत आहेत. या सर्व कार्यक्रमांमध्ये प्रवेश विनामूल्य असून, रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

## गणेशोत्सवासाठी नाशिक पोलिस सज्ज ! तब्बल 'इतके' गुन्हेगार हद्दपार

**नाशिक:** आज घरोघरी गणरायाचे आगमन होणार आहे. तर अनेक मंडळांच्या गणपतीचे आगमन मोठ्या थाटामाटात झाले आहे. गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित आणि निर्विघ्न वातावरणात पार पडावा यासाठी आता नाशिक पोलीस देखील सज्ज झाले आहे. शहरातील सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त संदिप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक शहर पोलीस आयुक्तालयामार्फत व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे नाशिक पोलिसांकडून कुलही स्वरूपाचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

उत्सवाच्या कालावधीत कोणत्याही व्यक्तीकडून शांततेचा भंग, सार्वजनिक उपद्रव अथवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये, यासाठी हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. परिमंडळ एक आणि दोन अंतर्गत ४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. त्यांना २७ सप्टेंबरपर्यंत शहर परिसरात वास्तव्यास राहण्यास मनाई करण्यात आली आहे. परिमंडळ एक अंतर्गत १२७, तर परिमंडळ दोन अंतर्गत २७५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ एक अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे - आडगाव ०७, पंचवटी २२, म्हसरूळ १०, भद्रकाली २४, सरकारवाडा ११, गंगापूर २२ आणि मुंबईनाका ३१, अशी परिमंडळ एकमध्ये एकूण १२७ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

## व्हेनेझुएलाच्या धर्तीवर इराणच्या तेलसंपत्तीवर नियंत्रण मिळवणार; डोनाल्ड ट्रम्प यांचे मोठे संकेत

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी एका वक्तव्यातून खळबळ उडवून दिली आहे. युद्ध संपल्यानंतरही इराणच्या आसपास अमेरिकेची लष्करी उपस्थिती कायम राहू शकते आणि व्हेनेझुएलाप्रमाणे इराणच्या तेलसंपत्तीवर नियंत्रण ठेवले जाऊ शकते, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.

आयरलंड दौऱ्यातील वक्तव्य आणि राजकीय संदर्भ

आयर्लंडमधील आयरिश ओपन गोल्फ स्पर्धेदरम्यान बोलताना ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, इराणसोबतचा संघर्ष नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांच्या आसपास किंवा त्याआधी संपू शकतो. अमेरिका इराणमधून अखेरीस बाहेर पडेल, परंतु गरज भासल्यास व्हेनेझुएलाच्या धर्तीवर तेथील तेलाचा ताबा घेतला जाऊ शकतो, असे ते म्हणाले. इराणकडून सातत्याने संपर्काचे प्रयत्न सुरू असले, तरी केवळ अमेरिकेच्या कडक अटींनुसारच योग्य करार स्वीकारला जाईल, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे.

सुरू असलेल्या या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारावर तीव्र परिणाम झाला आहे. कच्च्या तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्या आहेत, तर अमेरिकेत डिझेलचे दर विक्रमी पातळी गाठत प्रति गॅलन ६.२० डॉलरपेक्षा अधिक झाले आहेत. युद्ध संपताच अमेरिकेतील पेट्रोल-डिझेलच्या किमती वेगाने खाली घसरतील, असा दावा ट्रम्प यांनी केला आहे.

व्हेनेझुएला पॅटर्नची चर्चा

ट्रम्प यांच्या या विधानाची तुलना ३ जानेवारी रोजी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना सत्तेवरून हटवण्याच्या अमेरिकेच्या कारवाईशी केली जात आहे. सीआयएच्या मदतीने आणि विशेष दलांच्या व्यापक सरावानंतर मादुरो यांना ताब्यात घेण्यात आले होते. याच धर्तीवर अमेरिका इराणमध्येही लष्करी उपस्थितीसह तेथील विशाल तेलसाठ्यांवर आणि ऊर्जा संसाधनांवर ताबा मिळवण्याच्या रणनीतीवर विचार करत असल्याचे संकेत मिळत आहेत. इराणकडून अद्याप या विधानावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

## राज्यात हवामान खात्याचा मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई :** राज्यभरात आज गणेशोत्सवाचा मोठा उत्साह बघायला मिळत असताना पावसानं पुन्हा एकदा जोरदार पावसाची शक्यता आहे. तर मुंबई ठाणे, कोकणापासून ते विदर्भापर्यंत अनेक भागांमध्ये पावसाच्या सरी कोसळत आहे. कुठे रस्ते जलमय झालेत, कुठे गणेश मंडपामध्ये पाणी शिरलं, तर विदर्भ मराठवाड्यामध्ये याच पावसामुळे करपण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना जीवदान मिळाल्याने पावसाचं सावट असलं तरी बळीराजासाठी हा पाऊस दिलासा देणारा ठरला आहे. दरम्यान राज्यात हवामान खात्याने आज १४ सप्टेंबर आणि उद्या १५ सप्टेंबरला अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही भागांत अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. १४ सप्टेंबरला कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, उत्तर किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहू शकतात. मध्य महाराष्ट्रातही बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस होण्याचा अंदाज आहे.१५ सप्टेंबरलाही मुसळधार सरी बरसण्याची शक्यता आहे. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रातील काही भागांत तसेच मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस होऊ शकतो. विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे.

## अमेरिकेतील साईभक्तांकडून साई चरणी 18.84 लाखांची सोन्याचा मुलामा दिलेली चांदीची छत्री अर्पण



**शिर्डी (प्रतिनिधी) :** श्री गणेश चतुर्थीच्या पवित्र मुहूर्तावर अमेरिका स्थित साईभक्त के. चंद्रशेखर यांनी साईबाबांच्या चरणी ०८ किलो ९३३ ग्रॅम वजनाची शुद्ध सोन्याचा मुलामा दिलेली चांदीची छत्री भक्तिभावाने अर्पण केली. या छत्रीचे देणगी मूल्य १८ लाख ८४ हजार ८६३ इतके आहे. अर्पण करण्यात आलेली छत्री आज श्री साईबाबांच्या समाधी मंदिरातील मूर्तीवर माध्यान्ह आरतीपूर्वी प्रतिष्ठापित करण्यात आली. यावेळी संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साईभक्त के. चंद्रशेखर यांचा सत्कार केला. यावेळी जनसंपर्क विभागाचे प्रशांत सूर्यवंशी व मंदिर विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साई भक्ताकडून साई मंदिरासाठी 1 कोटी 33 किमतीचा नंदी देणगी रूपात अर्पण

**शिर्डी (प्रतिनिधी) :** उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साईभक्तांकडून ५४ किलो ०६५ ग्रॅम चांदीचा नंदी व बेस ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम सोन्याचे शिंग व बिंदी साई चरणी देणगी स्वरूपात अर्पण करण्यात आली असून या नंदीची किंमत जवळपास १ कोटी ३३ लाख आहे

श्री गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर उत्तर प्रदेशातील आग्रा येथील साईभक्तांकडून साईबाबांच्या चरणी ५४ किलो ०६५ ग्रॅम वजनाचा चांदीचा नंदी व बेस तसेच ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम वजनाचे २२ कॅरेट सोन्याचे शिंग व बिंदी अशी देणगी प्राप्त झाल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

श्री साईबाबा समाधी मंदिरातील श्रींच्या मूर्तीसमोरील जुन्या नंदीचे विधिवत उत्तरपूजन करून, श्री गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर नव्याने अर्पण करण्यात आलेल्या नंदीची धार्मिक विधीपूर्वक प्रतिष्ठापना अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

आग्रा येथील साईभक्तांनी अर्पण केलेल्या चांदीच्या नंदीचे वजन २७ किलो ०२७ ग्रॅम असून, त्याचे देणगीमूल्य ६० लाख २७ हजार ०२१ इतके आहे. तसेच नंदीसाठी अर्पण करण्यात आलेल्या चांदीच्या बेसचे वजन २७ किलो ०३८ ग्रॅम असून, त्याचे देणगीमूल्य रु. ६० लाख २९ हजार ४७४ आहे. चांदीचा नंदी व बेस यांचे एकूण वजन ५४ किलो ०६५ ग्रॅम असून, एकूण देणगीमूल्य १ कोटी २० लाख ५६ हजार ४९५ इतके आहे.

या चांदीच्या नंदीला विशेष धार्मिक व अलंकारिक स्वरूप देण्यासाठी २२ कॅरेट सोन्याचे शिंग कव्हर व सोन्याची बिंदी देखील अर्पण करण्यात आली



आहे. सोन्याच्या शिंगाचे वजन ६९ ग्रॅम ३०० मिलीग्रॅम, तर सोन्याच्या बिंदीचे वजन २९ ग्रॅम ३०० मिलीग्रॅम असून, दोन्ही अलंकारांचे एकूण वजन ९८ ग्रॅम ६०० मिलीग्रॅम आहे. या सोन्याच्या अलंकारांचे एकूण देणगीमूल्य १३ लाख ८५ हजार १३२ इतके आहे.

या साईभक्तांनी यापूर्वीही साईबाबांच्या चरणी विविध स्वरूपातील सोन्या-चांदीच्या वस्तू श्रद्धापूर्वक अर्पण केल्या आहेत. साईबाबांवरील अढळ श्रद्धेतून सातत्याने करण्यात येणारे त्यांचे हे योगदान साईभक्तीची समृद्ध परंपरा अधोरेखित करणारे आहे.

साईभक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या या अमूल्य दानातून साईबाबांच्या 'श्रद्धा आणि सबुरी' च्या संदेशाची अनुभूती अधिक दृढ होत असून, भक्ती, समर्पण आणि सेवाभावाची ही परंपरा अखंड सुरू आहे. साईभक्तांच्या विनंतीवरून त्यांचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही.

### आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते व्हीआयपी विश्रामगृह तसेच तहसीलदार व नायब तहसीलदार निवासस्थानाचे लोकार्पण

## भूमी अभिलेख अधिकारी कर्मचारी निवासस्थानाचे भूमिपूजन संपन्न

तभा. वृत्तसेवा

**गंगापूर दि.१४:** तालुक्यात अधिकारी व कर्मचारी मुख्यालय राहणे गरजेचे असल्याने व अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याचे अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे यावर गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी व्हीआयपी विश्रामगृह तसेच तहसीलदार यांचे निवासस्थान आणि कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाचे लोकार्पण करून भूमि अभिलेख अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाचे भूमिपूजन करण्यात आले. निवासस्थानामुळे अधिकारी आणि कर्मचारी हे मुख्यालयी निवास करतील त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी व जनतेचे कामे लवकरात लवकर करण्यात येऊ शकतील शासकीय कामांना लागणारा वेळ व पैसा वाचणार आहे.



गंगापूर शहरातील ३ कोटी ७० लाख रुपये खर्चाच्या व्हीआयपी विश्रामगृहाचे इमारतीचे लोकार्पण सोबतच गंगापूर तहसीलदार व नायब तहसीलदारांना ४ कोटी ३५ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या निवासस्थानाचे लोकार्पण व तसेच भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या २३ निवासस्थानाच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते रविवार (ता.१३) रोजी संध्याकाळी सहा ते साडेसात वाजेच्या दरम्यान हे तिन्ही कार्यक्रम वेगवेगळ्या ठिकाणी संपन्न झाले.

यावेळी आमदार प्रशांत बंब म्हणाले की गंगापूर तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध असून लोकांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याला विविध विकास कामाच्या माध्यमातून न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न करीत आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाला राहणे गरजेचे आहे. या वेगवेगळ्या उद्घाटनांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांची राहण्याची गैरसोय दूर होणारा असून सर्वसामान्य जनतेची कामे वेळेच्या आत पूर्ण होण्यास फार मोठी मदत होणार आहे.

याप्रसंगी गंगापूरचे तहसीलदार नवनाथ वगवाड, नायब तहसीलदार सचिन वाघमारे, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (वि.प्र.) गंगापूरचे उपविभागीय अभियंता डी. एम. कोलते, सहायक अभियंता पी. पी. काशेटवार, सहायक अभियंता अक्षय शिंदे, कनिष्ठ अभियंता नागेश कुकडे, सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभाग, छत्रपती संभाजीनगरचे उपअभियंता तोसीब याकूब दारूवाले, कनिष्ठ अभियंता अंजली राजाभाऊ संगवे, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.तसेच भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य किशोर धनायत भाजपा तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, नगरसेवक विजय पानकडे राकेश कळसकर मारुती खैरे भाग्येश गंगवाल, आबासाहेब शिरसाठ, आनंद पाटील कृष्णा सुकासे, सचिन विधाटे, गणेश चव्हाण, प्रशांत मुळे,कृष्णकांत व्यवहारे, रज्जाक पठाण , ज्ञानेश्वर सवई, संपत रोडगे,राजेंद्र राठोड, दिपक साळवे, अरविंद नहाटा यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौताळा कमानीजवळ दुचाकीचा अपघात; तीस वर्षीय इसम जखमी

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१४ सप्टेंबर - कन्नड-पिशोर मार्गावरील गौताळा कमानीजवळील चंदन नाला परिसरात दुचाकीचा अपघात होऊन किरण काळे वय ३० वर्षे (रा. धामणी) हे जखमी झाले. किरण काळे हे दुचाकी क्रमांक एमएच २० एफए ७७०७ वरून कन्नडहून पिशोरच्या दिशेने जात असताना हा अपघात झाला.

अपघाताची माहिती मिळताच पोलिस हेडकॉन्स्टेबल राजकुमार कुकलारे व पोलिस अंमलदार विशाल लोंढे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमी काळे यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा जाधव यांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविले.

किरण काळे हे मुंबई येथे महाराष्ट्र सुरक्षा मंडळात कर्मचारी म्हणून कार्यरत असल्याची माहिती आहे. अपघाताची नेमकी कारणे स्पष्ट झालेली नसून, घटनेचा पुढील तपास त्रिलोकचंद पवार करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## माजलगांव धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय ; मंत्रालयात बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न करू पंकजाताई मुंडे यांची युवा शेतकरी संघर्ष समितीला ग्वाही



**मुंबई :** माजलगांव (जि.बीड) येथील धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेतला गेल्याने परिसरातील बावीस गावातील शेतकरी हवालदिल झाले असून याबाबत लवकरच मंत्रालयात बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी युवा शेतकरी संघर्ष समितीला दिली. माजलगांव धरण परिसरातील बावीस गावच्या शेतकऱ्यांनी गेल्या काही दिवसांपासून युवा शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय रद्द व्हावा यासाठी आंदोलन सुरू केले आहे. या शेतकऱ्यांनी आज माजलगांव मधील भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यां मार्फत ना. पंकजाताई मुंडे यांच्याशी संपर्क साधून हा सर्व विषय त्यांच्या कानावर घातला. ना. पंकजाताईंनी शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे ऐकून घेतले आणि यासंदर्भात लवकरच मंत्रालयात बैठक बोलवून विस्तृतपणे चर्चा करून योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.

# नाळवंडीतील पिडित चिमुकलीला न्याय देऊ

### पंकजाताई मुंडेंचे बीड एसपींना निर्देश

बीड दि. १२ --- नाळवंडी ता. पाटोदा येथील आठ वर्षाच्या चिमुकलीवर झालेली अत्याचाराची घटना अत्यंत घृणास्पद आणि संतापजनक असून यातील नराधमाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी हे प्रकरण जलदगती कोर्टात चालवावे असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

या प्रकरणी आज ना. पंकजाताईंनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना फोन करून आरोपीवर कठोर कारवाई करण्यास सांगितले. नाळवंडी गावातील एका आठ वर्षाच्या चिमकुलीवर ६५ वर्षाच्या नराधमाने अत्याचार केला. या घटनेने पिडीत चिमुकलीचे कुटुंब भयभीत झाले आहे. घटनेतील आरोपीला पोलिसांनी अटक केली असली तरी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे आणि आरोपीवर कठोरात कठोर शासन करावे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

## कष्टाने यश मिळते : सागर उज्जैनकर

### रामराव पाटील विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**केज दि १३(प्रतिनिधी) :** केज येथील रामराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालयातील ११वी व १२वी च्या विध्यार्थ्यांना विकसित भारत यंग लीडर्स या कार्यक्रमातर्गत विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक डी एस खोसे, प्रमुख पाहुणे जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर साक्षी कराड,आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना सागर उज्जैनकर म्हणाले आई वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी मेहनत घ्यावी.यश टप्प्याटप्प्याने मिळते.प्रत्येकामध्ये असलेली क्षमता सकारात्मक कामासाठी वापरली पाहिजे.युवा,युवती हे देशाचे भविष्य आहेत.तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून यश मिळवता येईल असे मत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी एस डी कळेकर,एस एन नाईकनवरे आदींनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर नाईकनवरे यांनी तर आभार सतीश कळेकर यांनी मानले.

## योगेश्वरी पॉलीटेक्निक येथे माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन



**अंबाजोगाई :** योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलीटेक्निक येथे स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील पदविका उत्तीर्ण माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. मेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे यांच्या हस्ते होणार असून,प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अभियंता मा. इंजि. डॉ. नवनाथराव घाडगे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. चंद्रशेखर बर्दापूरकर राहणार आहेत. यावेळी संस्थेचे पदाधिकारी तसेच माजी विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणून जुन्या आठवणींना उजाळा देणे, परस्पर स्नेहबंध दृढ करणे आणि संस्थेशी असलेले नाते अधिक घट्ट करणे, हा मेळाव्याचा उद्देश आहे. स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे, स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. रोहित कदम व सर्व कर्मचाऱ्यांनी केले आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षात इनकमिंग सुरू

### माजी पंचायत समिती सदस्य सचिन शेळकेंसह शेकडो युवकांनी हाती घेतली तुतारी



**बीड दि.१३ (प्रतिनिधी):-** बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षामध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरू झाले आहे. रविवारी (दि.१३) रोजी उमरद (ज.) येथे माजी पंचायत समिती सदस्य सचिन शेळके यांच्यासह त्यांच्या अनेक युवक सहकाऱ्यांनी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली जाहीर पक्षप्रवेश केला.

या जाहीर प्रवेश सोहळ्याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आमदार सय्यद सलीम, वैजनाथ तांदळे, मदन जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य सचिन शेळके, दादासाहेब शेळके (सरपंच), बाळू कांबळे (ग्रा.पं.सदस्य), भारत गोरे (ग्रा.पं.सदस्य), रवींद्र आहेर (ग्रा.पं.सदस्य), दादासाहेब आहेर (ग्रा.पं.सदस्य), महादेव शेळके (ग्रा.पं.सदस्य), नवनाथ कांबळे (ग्रा.पं.सदस्य), सुभाष शिंदे (ग्रा.पं.सदस्य), शाम नरवडेकर (ग्रा.पं.सदस्य), अजिनाथ तांबे (सोसायटी सदस्य), कांता कांबळे

(सोसायटी सदस्य), पांडुरंग आहेर (सोसायटी सदस्य), लखन कांबळे, देवराव जाधव, नाना शिंदे, नवनाथ कांबळे, वैभव आहेर, गणेश टाकळे, आजिनाथ आहेर, कुंडलिक गोरे, आत्माराम आहेर, नारायण ताकिक, लक्ष्मण आहेर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश घेत तुतारी हाती घेतली. तसेच यावेळी पवन तांदळे (उपसरपंच, चर्हाटा), परवेज देशमुख (युवा नेते, बीड), दिलीप मिसाळ (ग्रा.पं. सदस्य, रुई), विलास पिसाळ (माजी सरपंच, रुई), संदीप सोळुंके (चेअरमन, रुई), जाकेर शेख, मधुकर चव्हाण, युवराज चव्हाण, रामेश्वर नवले, प्रवीण कथले, बाळासाहेब गव्हाणे, ज्ञानेश्वर बहीर, भाग्योदय बहीर, रवींद्र बहीर, सिद्धेश्वर बहीर आदी उपस्थित होते.

## सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय व्याख्यानमाला

**माजलगाव प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि १५ ते १७ सप्टेंबर दरम्यान तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प दि.१५ सप्टेंबर रोजी गुंफले जाणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रसिद्ध कवी व विचावंत संदीप जगताप हे बदलते सामाजिक वास्तव आणि अस्वस्थ तरुणाई या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. बी. आर. डक राहणार आहेत. द्वितीय पुष्प दि.१६ सप्टेंबर रोजी प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत डॉ. ललित अधाने गुंफणार असून 'अस्वस्थ तरुणाई पुढील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सत्यप्रकाश रुद्रवार भूषवणार आहेत तर दि. १७ सप्टेंबर रोजी तृतीय पुष्प प्रसिध्द गीतकार व विचारवंत प्रा. प्रशांत मोरे गुंफणार आहेत . "वर्तमान परिप्रेक्ष्यात आजची तरुणाई " या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. म.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार प्रकाश सोळंके हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत .तर व्याख्यानमालेत माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, डॉ. बळीराम चव्हाण, डॉ. शरद पवार, प्रताप रांजवण, निळकंठराव साबळे, सुरेंद्र रेदासणी, बालासाहेब शिंदे,. आण्णाभाऊ वगरे, डॉ. सुनिल गरड, डॉ. शिवाजीराव मुंडे, शिवाजीराव सुतार, विनायक कदम, भिमराव टाकणखार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. व्याख्यानमालेला उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. अभय सोळुंके, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे , उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, रजिस्ट्रार प्रशांत चव्हाण, प्रा.ज्ञानेश्वर कुंडकर प्रा.बापूराव वऱ्हाडे यांनी केले आहे.

## बीडमध्ये विश्व हिंदू परिषदेच्या संघटन विस्ताराला नवी दिशा

**आष्टी :** विश्व हिंदू परिषद, आष्टी प्रखंडाच्या वतीने आयोजित जिल्हा बैठकीत संघटनेच्या विविध कार्यांचा आढावा घेत आगामी उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. सेवा, संस्कार, सामाजिक समरसता, शिक्षण, आरोग्य, धर्मकार्य, गोसेवा तसेच मठ-मंदिरांशी संबंधित उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

विश्व हिंदू परिषदेकडून सेवा व सामाजिक कार्याच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, बालसंस्कार, महिला सक्षमीकरण, गरजूंसाठी मदत तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले



जातात. सामाजिक समरसता वाढविणे आणि समाजातील विविध घटकांमध्ये संपर्क व समन्वय वाढविण्याच्या दृष्टीनेही संघटनेच्या विविध विभागांमार्फत कार्य केले जाते.

या बैठकीस लातूर विभागाचे विभाग संघटनमंत्री किशोरजी कुलकर्णी आणि विभाग सहमंत्री गौरीशंकरजी कौलखेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विश्व हिंदू परिषद बीड जिल्हा सहमंत्री गणेशजी गुरखुदे, जिल्हा सहमंत्री गणेशजी सपकाळ, बजरंग दल जिल्हा संयोजक रामेश्वरजी कराड, जिल्हा सहसंयोजक रोहित सरोदे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत आष्टी व बीड प्रखंडातील संघटनात्मक रचना अधिक सक्षम करण्यासाठी विविध कार्यकर्त्यांवर नवीन दायित्वे सोपविण्यात आली. नागेशजी दादर यांची आष्टी प्रखंड मंत्री, विशाल माने यांची सहमंत्री आणि गणेश सांगळे यांची गोसेवा प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तसेच मारुती फुलमाळी आणि ऋषिकेश मुरकुटे यांच्यावर बजरंग दल सहसंयोजकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. अशोक धस यांची आरती प्रमुख, सुवर्णाताई देशपांडे यांची मातृशक्ती संयोजिका, तर अर

# पोकलैन मशीनचे ब्रेकर चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### 4 लाखांचा मुद्देमाल जप्त, 7 जणांना अटक



**बीड :** जिल्ह्यातील गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्गाच्या कामावरील पोकलैन मशीनचे ८ लाखांचे ब्रेकर चोरणाऱ्या सात जणांच्या टोळीला पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून ४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिस ठाणे गेवराई यांच्याकडून प्राप्त झालेल्या अधिकृत प्रेस नोटनुसार, गेवराई पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या माडळमोही पोलीस चौकीच्या हद्दीत जानेवारी २०२५ मध्ये टी अँड इन्फ्रा कंपनीतर्फे कल्याण ते विशाखापट्टणम जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ चे काम सुरू होते. या महामार्गाच्या कामावर फिर्यादीचे कोबेल्को कंपनीचे २२० मॉडेलचे पोकलैन मशीन लावले होते. दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.३० ते दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या दरम्यान, एचपी पेट्रोल पंपसमोर, हाडवे रोड, माडळमोही येथे लावलेले इंडस कंपनीचे रॉक ब्रेकर मॉडेल क्र. SAGA220S231-3024 (किंमत ८,००,००० रुपये) अज्ञात चोरांनी चोरून नेले होते. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा क्र. ५२०/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.संहिता २०२३ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास करताना गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी गुन्हा उघडकीस आणून ७ आरोपी निष्पन्न केले. यामध्ये ज्ञानोबा किसन काळे (वय ४७, रा. राजपिंप्री, ता. गेवराई, जि. बीड), अमोल अंकुश पवार (वय २८, रा. संजय नगर, गेवराई), सोमेश्वर मनोहर शेंडगे (वय ३८, रा. म्हाडा कॉलनी, गेवराई), दत्ताराम नारायण जाधव (वय ३६, रा. राजपिंप्री, गेवराई), किशोर लहू खंडागळे (वय ३०, रा. कोलेहर रोड शिवाजीनगर, गेवराई), रामेश्वर दिलीप पांगरे (वय २७, रा. कुंबेजळगाव, ता. गेवराई) आणि नामदेव भगवान जाधव (वय ५०, रा. राजपिंप्री, ता. गेवराई, जि. बीड) यांचा समावेश आहे. या सर्व आरोपींना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत ते पोलीस कोठडीत आहेत. वरील आरोपींच्या ताब्यातून चोरीस गेलेले इंडस कंपनीचे रॉक ब्रेकर (किंमत ८,००,००० रुपये) पैकी ४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोनिन अतुलकुमार लांडगे करत आहेत. या आरोपींविरुद्ध यापूर्वी पोलीस ठाणे जिंतूर (जि. परभणी), पोलीस ठाणे वडवणी (जि. बीड) आणि पोलीस ठाणे बीडकीन (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असून पोलीस कोठडीदरम्यानच्या चौकशीत आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि अतुलकुमार लांडगे, पोकों/२१०४ ऋषी पोटे, ग्रेपोउपनि राजाभाऊ गर्जे, पोह/२१३४ विजय परजणे, पोह/१७२४ देवडे, पोह/१८७४ संजय गुजर, पोह/२२३ कल्याण राठोड, पोकों/२२१६ शेखर हिंगावर, पोकों/८४९ नारायण सरवडे व पोकों/१००१ महादेव कदम यांनी सहभाग घेऊन यशस्वी पार पाडली आहे.

# गणेशोत्सवात भक्तीचा जागर; 'राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती' आरती संग्रहाचे बीडमध्ये वाटप

### प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून उपयुक्त धार्मिक साहित्य भाविकांपर्यंत; जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते पदाधिकारी-कार्यकर्त्यांना वितरण

**बीड :** गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात घराघरांत आणि सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये आरती, स्तोत्रपठण आणि धार्मिक उपक्रमांना विशेष महत्त्व असते. याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून प्रकाशित करण्यात आलेल्या 'राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती' या आरती संग्रहाचे बीड जिल्ह्यात वाटप सुरू झाले आहे.

या आरती संग्रहात विविध देवतांच्या आरत्या, रामरक्षा, हनुमान चालीसा, गणपती अथर्वशीर्ष तसेच महाराष्ट्र गीत यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात नियमित आरती व धार्मिक पठणासाठी हा संग्रह भाविकांना उपयुक्त ठरणार आहे.

बीड जिल्ह्यातील विविध गणेश मंडळांपर्यंत हा आरती संग्रह पोहोचविण्याचा उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून बीड येथील भाजप जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आरती संग्रहाचे वितरण करण्यात आले.

विशेष म्हणजे धार्मिक साहित्याबरोबरच या संग्रहात




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ ते २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध गरीब कल्याणकारी व जनहिताच्या योजनांची माहिती प्रत्येक पानावर देण्यात आली आहे. त्यामुळे धार्मिक व सांस्कृतिक आशयासोबत समाजोपयोगी कामांची माहिती देणारा हा संग्रह तयार करण्यात आला आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या उत्सवाच्या निमित्ताने आरती, स्तोत्रे आणि प्रार्थनांचा संग्रह भाविकांच्या हातात देण्याचा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरत आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पुढाकार घेऊन हा आरती संग्रह महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्हा भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले असून, या उपक्रमाचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते झालेल्या या वितरणानंतर जिल्ह्यातील विविध गणेश मंडळांपर्यंत आरती संग्रह पोहोचविण्याच्या कामाला वेग आला आहे. गणेशोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात आरती, स्तोत्रपठण आणि महाराष्ट्राच्या

# वर्षावासातून ज्ञान आणि प्रबोधनाची वाटचाल: माजलगावात 'मिलिंद प्रश्न'च्या माध्यमातून धम्मचिंतनाचा जागर

**माजलगाव :** वर्षावास म्हणजे धम्मश्रवण, चिंतन, मनन आणि चित्तशुद्धीचा पावन काळ. याच धम्मदृष्टीतून त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगाव यांच्या वतीने स्वामी विवेकानंद नगर, मंजरथ रोड येथील कौशांबी निवास येथे 'मिलिंद प्रश्न' या ग्रंथाचे नियमित सामूहिक वाचन सुरू आहे. कौशांबी निवासात वर्षावासानिमित्त ग्रंथवाचनाचा हा उपक्रम यंदा तिसरे वर्ष पूर्ण करीत असून, सातत्याने सुरू असलेली ही धम्म-अध्ययनाची परंपरा माजलगावच्या बौद्ध सांस्कृतिक जीवनात एक विधायक आणि प्रेरणादायी उपक्रम म्हणून आकार घेत आहे.

धम्मचारी अमोलरत्न, धम्मचारी मंजूरक्षित यांच्या मार्गदर्शनातून राजा मिलिंद आणि भंते नागसेन यांच्यातील प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून बुद्धधम्मातील तत्त्वज्ञान, प्रज्ञा आणि सम्यक दृष्टीचे चिंतन केले जात आहे. मिलिंद प्रश्नच्या संवादातून तर्क, चिकित्सक विचार आणि धम्मान्वेषणाची परंपरा उलगडत असून बुद्धकालीन संस्कृती, जीवनदृष्टी आणि धम्मदर्शनाची सखोल ओळख होत आहे.

ग्रंथवाचनासोबतच मागील सुमारे ४५ दिवसांपासून दररोज सकाळी ४० मिनिटे आनापानसती ध्यान आणि सायंकाळी २५ मिनिटे मैत्रीभावना साधना नियमितपणे घेतली जात आहे. सम्पूर्ण पूजा बुद्धवंदना, पाली गाथा सूत्रसंगायन तसेच विविध बौद्धिक व सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रमांमुळे वर्षावासाचे वातावरण अधिक धम्ममय झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २२ प्रतिज्ञा आणि बोधिसत्त्वांच्या प्रतिज्ञांबाबत जागर निर्माण करण्यासोबतच बौद्ध युवकांना रोजगार, स्पर्धा परीक्षा व रोजगारविषयक माहिती देण्याचे कार्यही केले जात आहे. त्यामुळे धम्मसाधनेसह शील, समाधी आणि प्रज्ञेच्या आधारे



धम्माचरण, प्रज्ञावर्धन आणि समाजहिताची भावना दृढ करण्याचा विधायक प्रयत्न या उपक्रमातून होत आहे.

या धम्मवाचन, ध्यान आणि प्रबोधनाच्या उपक्रमात धम्ममित्र लक्ष्मण सहजराव, नवनाथ शिनगारे, भीमराव ठाकरे, अरुण नाकलगावकर, दीपककुमार भालेराव, सुरेखाताई डोंगरे, वंदनाताई शिनगारे, वंदनाताई नाकलगावकर, पुष्पाताई रणदिवे यांच्यासह त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगावमधील सर्व धम्ममित्र बंधू-भगिनींचा सक्रिय सहभाग आहे. तसेच धम्मसहाय्यक उपासिका आशाताई सिरसट, प्रा. वत्सलाताई भिसे आणि नालंदा चांदमारे यांचे या धम्मकार्याला मोलाचे सहकार्य लाभत आहे.

ग्रंथातून धम्मबोध, ध्यानातून चित्तशुद्धी, प्रज्ञेतून सम्यक दृष्टी आणि आचरणातून धम्मपरिवर्तन— अशी वर्षावासाची ही वाटचाल माजलगावच्या बौद्ध सांस्कृतिक जीवनासाठी प्रेरणादायी ठरत आहे. बुद्धधम्म हा केवळ वाचन आणि श्रवणाचा विषय न राहता, २२ प्रतिज्ञा व बोधिसत्त्वांच्या प्रतिज्ञांतील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणून समतामूलक, विवेकनिष्ठ आणि करुणामय बौद्ध जीवनपद्धतीचा प्रतिज्ञाबद्ध सराव करण्याचा प्रयत्न या वर्षावासातून केला जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 बेंगळुरूमध्ये

मुंबई - भूपिंदर सिंह, प्रेसिडेंट – आईएमईए (भारत, मध्य पूर्व, अफ्रीका), मेस्से मुएनचेन आणि सीईओ , मेस्से मुएनचेन इंडिया म्हणाले, "भारताचा इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. मॅन्युफॅक्चरिंगचा विस्तार, धोरणात्मक पाठबळ आणि ग्लोबल व्हॅल्यू चेनमधील वाढती भागीदारी या क्षेत्राच्या वाढीला पुढे नेत आहेत. इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 चा मोठा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय सहभाग हीच गती दर्शवतो. बेंगळुरूमध्ये आमचे लक्ष उद्योगाच्या महत्त्वाकांक्षा योग्य तंत्रज्ञान, पुरवठादार आणि भागीदारींसोबत जोडण्यावर आहे, ज्यामुळे मजबूत उत्पादन क्षमता विकसित होईल आणि चांगले व्यावसायिक परिणाम साधता येतील."

## राज्यभरातील 4 लाखांपेक्षा जास्त नागरिकांना पाठबळ

**महाराष्ट्र :** स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एनएसई:स्टारहेल्थ; बीएसई: ५४३४१२) या भारतातील अग्रगण्य स्टँडअलोन आरोग्य विमा कंपनीने आर्थिक वर्ष २७ च्या पहिल्या तिमाहीत संपूर्ण महाराष्ट्रात ५७० कोटी रुपयांपेक्षा जास्त दाव्यांची (क्लेम्स) परतफेड केली आहे. यामुळे ४ लाखांहून अधिक नागरिकांना पाठबळ मिळाले असून राज्यभरातील कुटुंबांना बदलत्या आरोग्य गरजांचे व्यवस्थापन करण्यास मदत करण्यातील आरोग्य विम्याची भूमिका अधोरेखित झाली आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांनी या तिमाहीत आरोग्यसेवा वापराचे प्रमुख पॅटर्न दर्शवले, ज्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख नागरी आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाजारपेठांमधील उपचारांच्या गरजांची माहिती मिळते.

## बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 चे आयोजन

मुंबई- कन्स्ट्रक्शन मशिनरी, बिल्डिंग मटेरियल मशिन्स, मायनिंग मशिन्स आणि कन्स्ट्रक्शन वाहनांसाठी भारतातील 2026 मधील सर्वात मोठ्या ट्रेड फेअर्सपैकी एक असलेल्या बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 चे आयोजन 15 ते 18 सप्टेंबरदरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे केले जाणार आहे. पूर्णपणे बुक झालेल्या या आठव्या आवृत्तीत 14.5 लाख चौरस फूट क्षेत्रात 1,100 हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला 100 हून अधिक देशांमधून 75,000 पेक्षा जास्त व्हिजिटर्स येण्याची अपेक्षा आहे. बिहार सरकार स्टेट पार्टनर म्हणून सहभागी होणार आहे, तर 15 हून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून येणारी खरेदीदारांची शिष्टमंडळे देशभरातील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांसाठी आवश्यक उपकरणांच्या गरजा मांडतील.

## क्रोमावर नवीन आयफोन 18 प्रो लाइन-अपसाठी प्री-बुकिंग सुरू

**छत्रपती संभाजीनगर :** टाटा ग्रुपचा एक सदस्य आणि भारतातील आघाडीचा इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर ब्रँड असलेल्या क्रोमाने, नवीन आयफोन १८ प्रो आणि आयफोन १८ प्रो मॅक्ससाठी प्री-बुकिंग सुरू झाल्याची घोषणा केली आहे. ग्राहक आता देशभरातील कोणत्याही क्रोमा स्टोअरमध्ये,, टाटा नेउ ॲप आणि बिग बास्केटवर सुविधाजनक ऑफर्ससह ही सर्वात नवीन ॲपल डिव्हायसेस आता बुक करू शकतात. नवीन प्रो लाइन-अपमध्ये परफॉर्मन्स आणि फोटोग्राफीमधील ॲपलचे सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. यामध्ये शक्तिशाली ए२० प्रो चिप, ॲपलचे स्वतःचे सी२ वायरलेस मॉडेम आणि फिजिकली व्हेरिएबल ॲपर्चर असलेला नवीन ४८एमपी फ्यूजन मेन कॅमेरा यांचा समावेश आहे.हे प्री-बुकिंग देशभरातील २०० शहरांमधील ५६० हून अधिक क्रोमा स्टोअर्स, टाटा नेउ ॲप आणि बिग बास्केटवर उपलब्ध असेल. किंमत आणि उपलब्धतेच्या संपूर्ण माहितीसाठी, ग्राहक त्यांच्या जवळच्या क्रोमा स्टोअरला भेट देऊ शकतात किंवा ला भेट देऊ शकतात.

## गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर चिंतामणीचे दर्शन

छत्रपती संभाजीनगर - अदाणी एंटरप्रायझेसचे संचालक श्री. प्रणव अदाणी आणि अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) चे व्यवस्थापकीय संचालक श्री.करण अदाणी यांनी आपल्या कुटुंबीयांसह गणेश चतुर्थीच्या निमित्ताने चिंचपोकळीचा चिंतामणी येथे गणरायाचे दर्शन घेतले व प्रार्थना केली.अदाणी एंटरप्रायझेसचे व्यवस्थापकीय संचालक (ॲग्रो, ऑइल अँड गॅस) आणि संचालक प्रणव अदाणी म्हणाले, "चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळासोबत भागीदारी करण्याचा आम्हाला खरोखरच सन्मान वाटतो. 107व्या वर्षात पदार्पण केलेल्या चिंचपोकळीचा चिंतामणीचा समृद्ध वारसा हा भक्ती, एकता आणि मुंबईच्या सांस्कृतिक हृदयाचे प्रतीक राहिला आहे."

## विक्रेत्यांच्या सहभागात 26% वाढ

**मुंबई :** यंदाच्या गणेश चतुर्थीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र हा मीशोच्या प्रमुख सणासुदीच्या बाजारपेठांपैकी एक ठरला आहे. राज्यात मुंबई आणि पुणे या सणासुदीच्या खरेदीसाठीच्या प्रमुख बाजारपेठा ठरल्या. विशेष म्हणजे, सणासुदीची ऑनलाइन खरेदी केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता लहान शहरांमध्येही मोठ्या प्रमाणात विस्तारल्याचे दिसून आले. देशभरातील मीशोवरील गणेश चतुर्थीच्या एकूण ऑर्डर्सपैकी तब्बल ५३% ऑर्डर्स टियर-४ बाजारपेठांमधून आल्या. यामुळे छोट्या शहरांमध्येही सणासुदीच्या ई-कॉमर्सला मिळणारी वाढती पसंती अधोरेखित झाली आहे.

## 'द बॉक्स ' लॉन्च केले

**मुंबई :** रिअलएक्स आणि एमएसटी ब्लॉकचेन यांनी लिमिनल च्या भागीदारीत आज 'द बॉक्स' हे स्वदेशी इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक लॉन्च केले. भारतात रिअल-वर्ल्ड ॲसेट्स )चे नियमन व अनुपालनाच्या चौकटीत टोकनायझेशन सक्षम करणे हा यामागील उद्देश आहे.वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई हे या उपक्रमाचे इकोसिस्टम पार्टनर आहे. या लॉन्चद्वारे रिअलएक्सचे रेडबॉक्स आणि व्हाईटबॉक्स सादर करण्यात आले असून, हे दोन्ही प्लॅटफॉर्म एमएसटी ब्लॉकचेन च्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. भारतीय पायाभूत व्यवस्थेवर टोकनाइज्ड ॲसेट प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी आवश्यक कायदेशीर, मार्केटप्लेस आणि ब्लॉकचेन इन्फ्रास्ट्रक्चर एकत्र आणण्याचे काम ते करतात. रिअलएक्स चे रेडबॉक्स हे प्लेटफ़ॉर्म-एज़-अ-सर्विस सोल्यूशन असून, त्याद्वारे रिअल इस्टेट डेव्हलपर्सना स्वतःच्या ब्रँड, वेबसाइट आणि ग्राहक माध्यमांद्वारे टोकनाइज्ड प्रॉपर्टी ऑफरिंग लॉन्च करता येतील. तर व्हाईटबॉक्स हे ओपन-आर्किटेक्चर इन्फ्रास्ट्रक्चर लेयर आहे. याच्या माध्यमातून स्टार्टअप्स, कॉर्पोरेट्स आणि ॲसेट व्यवसायांना स्वतःच्या ब्रँडखाली आरडब्ल्यूए टोकनायझेशन प्लॅटफॉर्म उभारता येतील.

## महाराष्ट्रात 570 कोटी रुपयांपेक्षा जास्त दाव्यांची परतफेड

**मुंबई :** स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एनएसई:स्टारहेल्थ; बीएसई: ५४३४१२) या भारतातील अग्रगण्य स्टँडअलोन आरोग्य विमा कंपनीने आर्थिक वर्ष २७ च्या पहिल्या तिमाहीत संपूर्ण महाराष्ट्रात ५७० कोटी रुपयांपेक्षा जास्त दाव्यांची (क्लेम्स) परतफेड केली आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांनी या तिमाहीत आरोग्यसेवा वापराचे प्रमुख पॅटर्न दर्शवले, ज्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख नागरी आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाजारपेठांमधील उपचारांच्या गरजांची माहिती मिळते. आर्थिक वर्ष २७ च्या पहिल्या तिमाहीदरम्यान, स्टार हेल्थने मुंबईत २८० कोटी रुपये मूल्याचे ४१,३०० हून अधिक दावे आणि पुण्यात ११५ कोटी रुपये मूल्याचे २०,५०० हून अधिक दावे निकाली काढले. एकूण, स्टार हेल्थने राज्यभरात ९३,००० पेक्षा जास्त दावे निकाली काढले, जे महाराष्ट्रभरातील ग्राहक पाठबळाचा विस्तार दर्शवते. हा दाव्यांचा अनुभव अस्थिरोग व ट्रॉमा, नेत्ररोग, मूत्ररोग आणि कार्सिनोमा या उपचारांमधील ट्रेंड्सकडेही निर्देश करतो; जे सुरुवातीचे आरोग्य संरक्षण, पुरेसे विमा संरक्षण आणि आर्थिक सज्जतेचे महत्त्व अधोरेखित करते.

# 'माझा बाप्पा, स्वच्छतेचा राजा'; महापालिका गणेश मंडळाची प्राणप्रतिष्ठा उत्साहात

### महापौर समीर राजूरकर, आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने महापालिका मुख्य कार्यालय परिसरात गणेशोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये आणि महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

महापालिका अधिकारी-कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी मुख्य कार्यालय परिसरात गणेशोत्सव साजरा केला जातो. यंदाही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष तथा शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, उपआयुक्त अभय प्रामाणिक, मुख्य उद्यान अधिकारी विजय पाटील, सहायक आयुक्त लता पुजारी, प्रविण कुलकर्णी, अनिल बोंडे, ललित सूर्यवंशी, जितेंद्र खराडकर, संजय रगडे, महेश दुबे, अविनाश निकम तसेच माहिती व जनसंपर्क विभागाचे अतुल बनकर यांच्यासह महापालिकेतील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर समीर राजूरकर आणि आयुक्त अमोल येडगे यांनी 'माझा बाप्पा, स्वच्छतेचा राजा' या घोषवाक्याचा संदेश देत गणेशोत्सवात सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. गणेशोत्सव काळात शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी महापालिकेला सहकार्य करावे, तसेच प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले.

दरम्यान, यावेळी स्वच्छतेबाबत जनजागृती करणारे पथनाट्य सादर करण्यात आले. पथनाट्यातून स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

# पेट्रोल पंपाजवळ जुगार अड्ड्यावर छापा; पाच जण ताब्यात

### कन्नड शहर पोलिसांची कारवाई; 2 लाख 48 हजार 920 रुपयांचा मुद्देमाल जप्त



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१४ सप्टेंबर - धुळे-सोलापूर महामार्गालगत जिओ पेट्रोल पंपाजवळ सुरू असलेल्या जुगारावर कन्नड शहर पोलिसांनी छापा टाकून पाच जणांना ताब्यात घेतले. रविवारी (दि. १३) रात्री ११.२८ वाजता ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, तीन दुचाकी व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख ४८ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अवेज इलियास शेख (२८, रा. हतनूर, ह.मु. ऊर्स मैदानाजवळ, कन्नड), मुतलिफ शेख नशीम (२४, रा. काशी मोहल्ला), दिनेश रतन मोरे (३०, रा. म्हाडा कॉलनी), अक्षय सुभाष मोरे (२४, रा. म्हाडा कॉलनी) आणि निलेश रमेश डोले (२०, रा. भीमनगर, कन्नड) अशी कारवाईतील ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत.

पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने जिओ पेट्रोल पंपाजवळ छापा टाकला. यावेळी पाच जण जुगार खेळताना आढळून आले. त्यांच्या अंगझडतीत रोख रक्कम व मोबाईल तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य मिळून आले. याशिवाय तीन दुचाकी आणि जमिनीवर पडलेले ३७ पत्तेही पोलिसांनी ताब्यात घेतले.

याप्रकरणी पोलीस ठाणे कन्नड शहर येथे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा १४ सप्टेंबर रोजी पहाटे दाखल करण्यात आला.

ही कारवाई सहाय्यक पोलिस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री परिक्षाविधीन उपविभागीय पोलिस अधिकारी आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक केशरसिंग जारवाल, नवनाथ गाडेकर, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजकुमार कुकलारे, उल्हास पगारे, पोलिस अंमलदार नामदेव धोंडकर, विजय चौधरी, विशाल लोंढे, यांच्या पथकाने केली. विशेष म्हणजे, पोलीस उपनिरीक्षक जारवाल व पोलिस अंमलदार विजय चौधरी यांनी दोन दिवसांपूर्वीच ओडिशा राज्यातून एका फरार आरोपीला अटक करून कन्नडला आणले होते. त्यानंतर पुन्हा जुगाराविरोधात केलेल्या या कारवाईची शहरात चर्चा आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल उल्हास पगारे करीत आहेत.

# पैठणला श्रींचे जल्लोषात आगमन



**तभा वृत्तसेवा पैठण दि १४ :-** धार्मिक भूमी श्रीक्षेत्र पैठणला आराध्य दैवत गणपती बाप्पाचे ढोल तासांच्या गजरात भव्य अतिशबाजीने जल्लोषात आगमन झाले असून येणाऱ्या १२ दिवस गणराया आपल्या भक्तांसोबत राहणार आहेत.

हरीतालिका तृयीया व गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर लाडक्या बाप्पांचे धूम धडाक्यात आगमन झाले. यंदा पैठणच्या गागाभट्ट चौकात बाप्पांच्या मूर्तीच्या असख्य दुकाना लागल्या होत्या त्यासोबत पूजा साहित्य आणि डेकोरेशनचे स्टॉल ही मोठया प्रमाणात लावण्यात आले. याठिकाणी गणेश भक्तांनी रविवार पासूनच श्री मूर्ती खरेदीसाठी गर्दी केली.परिसरात सोमवारी मूर्ती घेण्यासाठी हजारो गणेश भक्तांनी हजेरी लावली. शहरातील आद्य गणेश मंडळ, कापड मंडई, महाराणा प्रताप नगर, नाथगल्ली, कुचर ओटा, काला पहाड,पिठूबंरागल्ली मामा चौक, रंगारहट्टी, गजाचा मारोती, संत नगर, गाढेश्वर, डोलेश्वर, कहारवाडा, संत रविदास नगर, हमालगल्ली,भवानी नगर,बस स्थानक परिसर, खळवाडी, नवीन कावसण, लक्ष्मीनगर,इंदिरा नगर,सराफनगर, शशीविहार, बालाजी विहार, नाथ विहार, अन्नपूर्णा नगर,यशवंत नगर, नारळा, गांगलवाडी, भाजी मार्केट, साळीवाडा,साठेनगर, लहुजीनगर, लोहार गल्ली, पावर हाऊस,नेहरू चौक, दुर्गावाडी,पापानगर सह ग्रामीण भागात मोठया जल्लोषात लाडक्या बाप्पांचे आगमन झाले.

# राष्ट्रमाता जिजाऊ प्रतिष्ठान गणेशोत्सव मूर्तीचे थाटात आगमन



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१४:** गंगापूर शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ प्रतिष्ठानच्या पंचवीस फुटी गणेश मूर्तीचे फटाक्याच्या आतीश बाजी आणि ढोल ताशाच्या गजरात असंख्य गणेश भक्त आणि भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी मिरवणुकीसाठी नारळ फोडून शुभारंभ केला यावेळी कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला. प्रभाग क्रमांक दोन चे नगरसेवक राकेश कळसकर आनंद पाटील यांच्या पुढाकाराने उत्सव साजरा होत आहे.

भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य किशोर धनायत नगरपरिषदचे उपाध्यक्ष अमोल जगताप भाजपा तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, नगरसेवक विजय पानकडे राकेश कळसकर मारुती खैरे भाग्येश गंगवाल, आबासाहेब शिरसाठ, आनंद पाटील कृष्णा सुकासे, सचिन विधाटे, चेअरमन लक्ष्मण भुसारे नंदकुमार गांधिले गणेश चव्हाण, प्रशांत मुळे,कृष्णकांत व्यवहारे, रज्जाक पठाण , ज्ञानेश्वर सवई, संपत रोडगे,राजेंद्र राठोड, दिपक साळवे, अरविंद नहाटा दत्तात्रय बुचडे गोरखनाथ जावळे गणेश वाडेकर किरण जोशी किरण सरोदे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रमाता जिजाऊ प्रतिष्ठाण गणेशोत्सव कार्यकारिणी. अध्यक्ष ज्ञानेश्वर काटकर उपाध्यक्ष आकाश काटकर सचिव चिंटू जंगम सहसचिव प्रफुल्ल काटकर रोहित काटकर कार्याध्यक्ष रोहित रोकडे सदस्य संदीप काटकर गुजु काटकर सुदाम बारहाते नचिकेत बोर्डे सोनू भवार भूषण काटकर पार्थ राजपूत ओंकार काटकर राजू काटकर आधी सदस्य कार्यरत आहेत.

# आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर कन्नड शहरात पोलिसांचा रूटमार्च



तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.१४ सप्टेंबर -

आगामी गणेशोत्सव तसेच सणांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कन्नड शहर पोलिसांनी रविवारी (दि. १४) शहरातून रूटमार्च काढला. गणेश विसर्जनाच्या मार्गावरून काढण्यात आलेल्या या रूटमार्चद्वारे पोलिसांनी शहरातील नागरिकांना शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले.

कन्नड शहर पोलिस ठाण्यापासून रूटमार्चला सुरुवात झाली. अण्णाभाऊ साठे चौक, शासकीय विश्रामगृह, शनी मंदिर, सिद्धीक चौक मार्गे पुन्हा पोलिस ठाण्यापर्यंत रूटमार्च काढण्यात आला. गणेशोत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होणाऱ्या प्रमुख मार्गांची पाहणीही यावेळी करण्यात आली.

रूटमार्चमध्ये अमरावती येथील राज्य राखीव पोलिस दलाचे तीन अधिकारी व ८१ पोलिस अंमलदार सहभागी झाले होते. तसेच कन्नड शहर पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी आणि होमगार्ड यांचाही सहभाग होता. पोलिसांचा मोठा बंदोबस्त रस्त्यावर दिसून आल्याने शहरातील नागरिकांचे लक्ष वेधले गेले. गणेशोत्सव आणि आगामी सण शांततेत पार पडावेत, यासाठी पोलिसांकडून बंदोबस्ताचे नियोजन करण्यात येत आहे. संवेदनशील ठिकाणे, विसर्जन मार्ग तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची विशेष नजर राहणार असून, कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

## स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रातील संपादकांचा गौरव



तभा वृत्तसेवा

**मुंबई :** महाराष्ट्र संपादक परिषदेचे संस्थापक व ज्येष्ठ पत्रकार स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रातील संपादक व ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्याचा निर्णय परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल-श्रीफळ आणि रोख रक्कम देऊन गौरव करण्यात येणार आहे.

मुंबईतील शिवाजी पार्क येथील होरायझन टॉवरमध्ये परिषदेचे उपाध्यक्ष सुधीर भाऊ जाधव यांच्या कार्यालयात अध्यक्ष एकनाथ बिरवटकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. स्व. यशवंत पाध्ये यांनी संपादकांना संघटित व्यासपीठ मिळावे, त्यांच्या प्रश्नांना वाचा फुटावी आणि संपादकांना योग्य मानसन्मान मिळावा, या उद्देशाने परिषदेची स्थापना केली होती. बैठकीच्या प्रारंभी परिषदेचे सचिव स्व. अनंत ऊर्फ राजू पाध्ये यांना आदरांजली वाहण्यात आली. बैठकीस कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, उपाध्यक्ष सुधीर भाऊ जाधव, गजानन चव्हाण, दीपाताई पाध्ये, हेमंत सामंत, राजेंद्र मोहिते, अरुण सुरडकर, गोरख तावरे आणि डी. पी. विष्णुपुरीकर यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

## दशलक्षण पर्वानिमित्त वेरूळ गुरुकुलात तत्वार्थ सूत्र महामंगल विधान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** जैन धर्मीयांच्या पवित्र दशलक्षण महापर्वानिमित्त वेरूळ येथील पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुलात १६ ते २६ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १५ सप्टेंबर रोजी मंडपशुद्धी व घटयात्रेने कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. १६ सप्टेंबरपासून दररोज सकाळी ६ वाजता अभिषेक, पूजन व बोल्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

दहा दिवसांच्या पर्वात तत्वार्थ सूत्र महामंगल विधान तसेच मुनिश्री १०८ नियमसागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांच्या मंगल प्रवचनांचे दररोज दुपारी ३ वाजता आयोजन करण्यात आले आहे. १९ सप्टेंबर रोजी पुष्पदंत भगवान आणि २५ सप्टेंबर रोजी वासुपूज्य भगवान यांच्या मोक्ष कल्याणकानिमित्त निर्वाण लाडू अर्पण करण्यात येणार आहेत. २६ सप्टेंबर रोजी विश्वशांतीसाठी होम-हवन होईल. बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी निवास व शुद्ध भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. बालब्रह्मचारी मनीष भैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम होणार असून, सकल जैन समाजाने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल सागर जाधव यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्कार




तभा वृत्तसेवा


**छत्रपती संभाजीनगर :**दि.१४ सप्टेंबर - शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सागर जाधव यांना 'मराठवाडा रत्न पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथे १३ सप्टेंबर रोजी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते जाधव यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मराठवाड्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यासाठी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, जिल्हा शिक्षण अधिकारी अश्विनी लाटकर, वेदांत इनोटेकचे व्यवस्थापकीय संचालक सतीश कल्याणकर, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, गजानन पठाडे, नंदकिशोर वल्ले पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी रिसील डॉट इनचे संस्थापक सुधीर कुमार पठाडे यांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले. विविध क्षेत्रांत कार्यरत व्यक्तींच्या योगदानाचा गौरव करणारा हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

## दादासाहेब मगर यांना पीएच. डी. प्रदान

**छत्रपती संभाजीनगर, दि.१४ :** एमजीएम विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे आणि मानव्य विद्या शाखेचे संशोधक श्री.दादासाहेब सुभेदार मगर यांना 'अ कम्पॅरेटिव्ह स्टडी ऑफ फार्मास्युटिकल इन्स्टिट्यूट्स' लायब्ररीज इन वेस्टर्न महाराष्ट्र' या विषयावर पीएच. डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांना ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे डॉ.बालाजी दामावले यांचे मार्गदर्शन लाभले.

## सचिन गोंदकर यांचे अल्पशा आजाराने निधन; गोंदकर परिवारावर शोककळा



शिर्डी ( प्रतिनिधी)

श्री साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. एकनाथराव गोंदकर यांचे द्वितीय चिरंजीव प्रगतीशील शेतकरी आणि यशस्वी उद्योजक सचिन एकनाथराव गोंदकर (वय ४४) यांचे शनिवारी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखाद निधन झाले. शिर्डी येथील साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या अकाली जाण्याने शिर्डी शहरासह संपूर्ण परिसरात आणि गोंदकर परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सचिन गोंदकर यांच्या निधनाची वार्ता समजताच शिर्डी शहरावर शोककळा पसरली. गोंदकर परिवाराचे राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठे वलय असतानाही सचिन गोंदकर यांनी अत्यंत साधेपणाने आपले जीवन व्यतीत केले. एक यशस्वी उद्योजक आणि प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. वडील डॉ. एकनाथ गोंदकर हे मातब्बर राजकीय व्यक्तिमत्त्व आणि संस्थानचे प्रदीर्घ काळ विश्वस्त राहूनही सचिन यांनी कधीही सत्तेचा वा पदाचा अहंकार बाळगला नाही. अत्यंत मितभाषी, नम्र आणि संयमी स्वभावामुळे त्यांचा मोठा मित्रपरिवार होता.

त्यांच्या पश्चात मुलगा कृष्णा, पत्नी प्रियाताई गोंदकर, आई तथा गणेश कारखान्याच्या संचालिका शोभाताई गोंदकर, बंधू ॲड. संदीप गोंदकर, चुलते ज्ञानदेव गोंदकर भाऊ सुजित गोंदकर, शंकर गोंदकर, साईप्रसाद गोंदकर आणि पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केले असून गोंदकर परिवाराच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा धीर दिला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# ‘ब्रिक्स’कडून अपेक्षा

ब्रिक्स संघटना कुणाच्याही विरोधात नसून सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा तिचा प्रयत्न आहे, असे स्पष्ट करीत परिषदेच्या उद्‌घाटनीय भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण जगाला ‘वसुधैव कुटुम्बकम्’चा संदेश नव्याने दिला आहे. १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे नवी दिल्लीत आयोजन झाले. भारताने घेतलेल्या भूमिकेचे त्यात सर्व देशांनी समर्थन केले. सर्व प्रकार आणि स्वरूपातील दहशतवादाचा विरोध, व्यापार आणि पुरवठा साखळीत व्यत्यय आणणारे एकतर्फी व्यापारशुल्क आणि संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा, या तीन अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांचा समावेश दिल्ली जाहीरनाम्यात करण्यात आला. विशेष म्हणजे सर्वच सदस्यांनी एकमताने या जाहीरनाम्याला मंजुरी दिली. असा इतिहास राहिला आहे की, सुरक्षा परिषदेत भारताने एखाद्या दहशतवाद्यावर प्रतिबंध लादण्याचा प्रस्ताव सादर केला, तेव्हा त्याला चीनने विरोध केला. तथापि, दिल्ली जाहीरनाम्यात पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला असून, त्याला चीनने पाठिंबा दर्शविला आहे आणि भारतासाठी हे मोठे यश मानले जात आहे. परिषदेचे भव्य आयोजन करून भारताने पाश्चिमात्य देशांना स्पष्ट संदेश तर दिलाच आहे; शिवाय, पंतप्रधान मोदी यांनी परिषदेसाठी आलेल्या नेत्यांसोबत सहज आणि दिलखुलास संवाद साधत सर्वांची मने जिंकली. त्यांच्या देहबोलीतून प्रचंड आत्मविश्वास झळकत होता. मोदी यांनी अत्यंत सहजतेने रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचे हात हातात घेऊन त्यांचे परिषद स्थळी स्वागत केले. तिन्ही नेते स्मित हास्य करीत असल्याचे छायाचित्र जगभरात प्रचंड व्हायरल झाले आणि अवघ्या काही मिनिटांतच त्याला कोट्यवधी लाईक्स मिळाले. कारण हा साधा प्रसंग नव्हता, तर तीन शक्तिशाली देश दिल्लीत एकत्र आले आहेत, हा संदेश देणारा तो प्रसंग होता.

जग आज विविध प्रकारच्या संघर्षांतून मार्गक्रमण करीत आहे. इराण-अमेरिका आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे अनेक देश आर्थिक संकटातून जात आहेत. जे दोन देश एकमेकांविरुद्ध लढत आहेत, त्या इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि संयुक्त अरब अमिरातचे युवराज शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान या परिषदेला उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी मुत्सद्देगिरीचा वापर करीत परस्परविरोधी भूमिका असलेल्या देशांनाही एका मंचावर आणले. ब्रिक्स परिषदेच्या माध्यमातून भारताची चीन आणि मलेशिया या देशांसोबत द्विपक्षीय चर्चाही झाली. कोरोना महामारी आणि डोकलाम व गलवान संघर्षानंतर भारत-चीन यांच्या संबंधात तब्बल पाच वर्षे तणाव होता. लडाखमध्ये दोन्ही देशांचे जवान कित्येक महिने एकमेकांसमोर उभे ठाकले होते. व्यापार ठप्प झाला, विमानसेवाही थांबविण्यात आली होती. याचा फटका दोन्ही देशांना बसला. दीर्घकाळ शत्रुत्व नुकसानकारक असल्याची जाणीव झाल्याने शी जिनपिंग दिल्लीत आले. जेथे शांतता असते, तेथे वैभव नांदत असते. हैदराबाद हाऊसमध्ये मोदी-जिनपिंग यांच्यात चर्चा झाल्यानंतर दोघांनीही शांततेवरच भर दिला. सीमेवर शांतता कायम ठेवणे हा दोन्ही देशांसाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. सीमेवरील तणावाचे रूपांतर थेट संघर्षात होणार नाही, याची खात्री करण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले. मध्यंतरीच्या काळात मलेशियासोबतचे संबंधही ताणले गेले होते. रशिया-युक्रेन युद्धामुळे सूर्यफुलाची आयात घटल्याने भारतात खाद्यतेलाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले होते. मलेशियाचे तत्कालीन पंतप्रधान महातिर मोहम्मद यांनी काश्मीर मुद्दा, सीएए आंदोलनात नाक खुपसले होते. तसेच झाकीर नाईक मुद्दाही तापला होता. नवी दिल्लीने थेट पामतेल खरेदीवर निर्बंध लादल्याने मलेशियाची पंचाईत झाली होती. दरम्यान, सत्तापालट होऊन अन्वर इब्राहिम पंतप्रधान झाले. त्यांनी लवचीक भूमिका घेत संबंध सुरळीत केले. हैदराबाद हाऊस येथे पंतप्रधान मोदी आणि अन्वर इब्राहिम यांच्यात चर्चा झाली. दिलखुलास वृत्तीचे असलेले अन्वर यांनी भरमंचावरून पंतप्रधान मोदी यांच्या लोकप्रियतेचे कौतुक केले.

जगात आज ज्या काही प्रभावशाली संघटना कार्यरत आहेत, त्यात साऊथ ग्लोबल देशांचा समूह असलेल्या ब्रिक्सचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. आजही १९० पेक्षा सदस्य असलेले संयुक्त राष्ट्रसंघ शक्तिशाली संघटना असली तरी संवेदनशील मुद्दे हाताळण्यात युनो अपयशी ठरली आहे. यामागे सुरक्षा परिषदेतील पाच स्थायी देशांकडे असलेला नकाराधिकार कारणीभूत आहे. ही संघटना १९४५ मध्ये स्थापन झाली. मात्र, एवढी वर्षे होऊनही त्यात सुधारणा करण्यात आली नाही. आज जगाचा चेहरामोहरा बदललेला आहे. जग बहुध्रुवीय झाले आहे. युनो अपयशी ठरत असल्यानेच जी-७, क्वाड, ब्रिक्स आणि मुस्लिम नाटोसारख्या संघटनांचा उदय झाला. अमेरिकेचा प्रभाव असलेली नाटो ही संघटना सध्या खिळखिळी झाली आहे. कारण, युक्रेनवरील रशियाचे आणि इराणवरील अमेरिकेचे आक्रमण झाल्यानंतरही नाटोतील एकही देश ना युक्रेनच्या थेट मदतीला धावला ना अमेरिकेच्या. बदलत्या जगाचे प्रतिबिंब पडावे आणि अमेरिकेसह युरोपियन देशांची विरोधक संघटना होण्यापेक्षा एक स्वायत्त व्यासपीठ म्हणून काम करण्याची संधी ‘ब्रिक्स’पुढे आहे. विकसनशील देशांकडे बड्या देशांकडून दुर्लक्ष होत असल्याने ‘ब्रिक्स’च्या दिशेने पाऊल पडले.

आजपासून २० वर्षांपूर्वीचा काळ आठवला तर जगभरात दहशतवादाने थैमान घातले होते. सप्टेंबर २००१ मध्ये ओसामा बिन लादेनने थेट वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला करीत अमेरिकेच्या शेपटीवर पाय दिला. घायाळ नाग चवताळून उठावा तशी अमेरिका सूडाच्या भावनेने बेभान झाली. दक्षिण आशियात सर्वत्र अस्थिर वातावरण निर्माण झाले होते. दोनच महिन्यांनी जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने लोकशाहीचे मंदिर असलेल्या भारताच्या संसदेवर डिसेंबर २००१ मध्ये हल्ला चढविला. जम्मू-काश्मीरही धगधगत होते. वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर अमेरिकेच्या लष्करी मर्यादा उघड्या पडायला सुरुवात झाली. भू-राजकीय रचनेतही बदल होण्यास सुरुवात झाली. अमेरिकाकेंद्रित एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेला पर्याय देण्याची गरज असल्याची जाणीव विकसनशील आणि साऊथ ग्लोबल देशांना जाणवू लागली. हाच धागा पकडून २००६ मध्ये भारत, चीन, ब्राझील आणि रशिया यांनी एकत्र येऊन ब्रिक संघटनेची पायाभरणी केली. जागतिक पातळीवरील आर्थिक व राजकीय निर्णयांमध्ये अधिक सक्रिय आणि प्रभावी भूमिका बजावता यावी म्हणून ब्रिकने मांडणी करायला सुरुवात केली. २००९ मध्ये रशियात संघटनेची पहिली बैठक झाली आणि २०१० मध्ये दक्षिण आफ्रिका सहभागी झाल्यानंतर ‘ब्रिक्स’ असे नामकरण करण्यात आले. सध्या संघटनेचे ११ सदस्य असून भागीदार देशांसह एकूण २१ सदस्य आहेत. लोकसंख्येच्या बाबतीत ब्रिक्सचा विस्तार मोठा आहे. भारत आणि चीन हे लोकसंख्येच्या बाबतीत पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर आहेत. सर्व देशांची एकत्रित लोकसंख्या ही जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० ते ४५ टक्क्यांच्या आसपास आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे पश्चिमेकडे असलेली आर्थिक, लष्करी आणि राजकीय सत्तेची केंद्रे अन्यत्र सरकू लागली. लॅटिन अमेरिकेतील देशही ‘ब्रिक्स’कडे आशेने पाहत आहेत. राजनैतिक पातळीवर परस्परांचे विरोधक देशही या संघटनेत सहभागी असल्याने त्यांच्यात संतुलन साधण्याचे आव्हान पेलावे लागेल. लष्करी आणि आर्थिकदृष्ट्या चीन हा ब्रिक्समधील सर्वांत प्रभावशाली तर भारत विश्वासार्ह आणि सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश आहे. ‘ब्रिक्स’ परिषदेचा समारोप झाला आहे. ब्रिक्स देशांना एकत्र ठेवण्याची, अधिक देश जोडण्याची आणि जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेण्याची जबाबदारी भारताला पेलावी लागणार आहे. कारण भारत हीच जगाची आशा आहे आणि त्यामुळेच ‘ब्रिक्स’कडून जगाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# ब्रिक्सनंतरची अमेरिका !

सांडाला लाल कापड दाखविले की तो अधिक बिथरतो असे म्हटले जाते. यात तथ्य किती हा भाग वेगळा. नवी दिल्लीत भारताने १२-१३ सप्टेंबर रोजी केलेले ब्रिक्स परिषदेचे यशस्वी आयोजन अमेरिकेला लाल कापड दाखविण्यासारखे ठरणार आहे. अगोदरच भारताविरोधात भूमिका घेणारे राष्ट्रपती ट्रम्प आणखी बिथरतील काय, असा प्रश्न दबक्या आवाजात विचारला जात आहे.

**यशस्वी आयोजन :** नवी दिल्लीच्या भारत मंडपम सभागारात झालेली ही बैठक यशस्वीपणे पार पडली. कधी काळी मौलाना आझाद मार्गावरील विज्ञान भवन हे आंतरराष्ट्रीय बैठका-संमेलने याचे केंद्र होते. भारत मंडपम बांधण्यात आल्यानंतर हे सभागृह आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांच्या आयोजनाचे केंद्र झाले आहे. संमेलनात सर्वांत महत्त्वाची उपस्थिती होती चीनचे राष्ट्रपती शी जिन पिंग यांची.

**महत्त्वाचे निर्णय :** ब्रिक्स संमेलनात काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. याचे दूरगामी परिणाम होतील असे मानले जाते. ब्रिक्स होण्यापूर्वी क्रेमलिनच्या प्रवक्त्याने केलेले भाष्य ‘डॉलरचा मुद्दा’ अद्याप अस्तित्वात असल्याचा संकेत देत आहे. ‘आम्हाला डॉलर संपवायचा नाही. मात्र, ब्रिक्स देशांनी आपापल्या चलनात व्यवहार करणे सुरू केले असून आमचे ९० टक्के व्यवहार त्या-त्या देशांच्या चलनात होत आहेत’ असे क्रेमलिनने म्हटले आहे. याचा सरळसरळ अर्थ डॉलरला शह देणे हा असल्याचे मानले जाते. या परिषदेतही आपापल्या चलनांनुसार आर्थिक व्यवहार करण्यावर भर देण्यात आला असल्याचे समजते. डॉलरबाबत ब्रिक्सकडून कोणतीही अधिकृत घोषणा होण्याची अपेक्षाच नव्हती.

**ब्रिक्सचा इतिहास :** ब्रिक्स म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण अफ्रिका यांनी एकत्र येत स्थापन केलेले एक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ. प्रारंभी ब्रिक ही चार देशांची संघटना होती. नंतर त्यात दक्षिण आफ्रिका सामील झाल्याने ब्रिकचे ब्रिक्स झाले. नंतर यात आणखी सहा देश सामील झाले. इजिप्त, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिरात, इथोपिया, इराण व बांगलादेश. ब्रिक्सचा आणखी एक अर्थ म्हणजे, बिल्डिंग फॉर रिझिलियन्स, इनोव्हेशन, को-ऑपरेशन, ससटेनॅलिबिटी.

**४० टक्के लोकसंख्या :** जगातील ४० टक्के लोकसंख्या असणारे देश व जागतिक जीडीपीचा मोठा भाग म्हणजे ब्रिक्स संघटना असे समीकरण तयार झाले आहे. याला जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांना शह देणारी संस्था मानले जाते. अमेरिकेच्या नियंत्रणाखालील या दोन आर्थिक संस्थांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ब्रिक्सने न्यू डेव्हलपमेंट बँक स्थापन केली आहे. अशा या ब्रिक्समध्ये अमेरिकेचे तीन कट्टर शत्रू देश रशिया, चीन व इराण सामील असताना भारताने ब्रिक्सचे आयोजन-संयोजन केले. याची प्रतिक्रिया अमेरिकेत उमटणार आहे. मात्र ती कशी असेल हे मात्र आज कुणालाही सांगता येणार नाही.

**जिन पिंग यांची उपस्थिती :** भारत-चीन संबंधात मधल्या काळात कमालीचा तणाव निर्माण झाला होता. २०२० मध्ये गल्वान खोऱ्यात भारत-चीन सैनिकांमध्ये झडलेला रक्तरंजित संघर्ष, नंतर चीनने भारताच्या काही प्रदेशांत घुसखोरी करणे, चीनने या भागातून माघार घ्यावी यासाठी २०-२५ बैठकांचे आयोजन होणे, नंतर चीनने माघार घेणे. पण चीनने अगदी भारताच्या सीमेलगत काही महत्त्वाची लष्करी अशी प्रतिष्ठाने उभारणे, ऑपरेशन सिंदूर दरम्यान चीनने पाकिस्तानला महत्त्वाची उपकरणे पुरविणे, सर्व प्रकारचे सहकार्य करणे - दोन्ही देशांच्या संबंधांना अशी पार्श्वभूमी असताना शी जिन पिंग यांनी भारतात येणे याला एक महत्त्व दिले जात आहे. यात बहुधा रशियाने महत्त्वाची व मध्यस्थाची भूमिका पार पाडली असावी असे मानले जाते. जिन पिंग यांनी आपल्यासोबत ४०० अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ आणले होते. ७ वर्षांपूर्वी तामिळनाडूतील मल्लिपुरम् येथे झालेल्या भारत-चीन शिखर परिषदेसाठी जिन पिंग यांच्यासोबत आलेल्या शिष्टमंडळात २०० अधिकारी होते. चीन आता भारतासोबत नवा अध्याय सुरू करण्याच्या मनःस्थितीत असल्याचे दिसून येते. मात्र चीनची प्राथमिकता पाकिस्तान राहणार आहे हेही विसरून चालणार नाही. भारत-चीन वाढत्या सहकार्यामुळे अमेरिका नाराज होणार हे स्पष्ट आहे.

**आता भर इराणची :** अमेरिकेच्या नाराजीत भर पाडणारी घटना म्हणजे ब्रिक्स परिषदेत इराणची उपस्थिती. अमेरिका-इराण युद्ध अद्यापही सुरू आहे आणि ते आणखी दोन-तीन महिने तरी चालणार असल्याचा संकेत राष्ट्रपती ट्रम्प देत आहेत. अमेरिका ज्या देशाशी युद्ध लढत आहे, त्या देशाचे स्वागत भारताने करावे ही बाब ट्रम्प यांना टोचणारी आहे. पण या साऱ्या बाबी बाजूला ठेवीत ब्रिक्सची परिषद झाली आणि जगाच्या अर्थव्यवस्थेला प्रभावित करणारे निर्णय घेण्यात आले.

**दोन पैलू :** ब्रिक्समध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांचे दोन पैलू आहेत. एक भाग म्हणजे आर्थिक सहकार्याचा. याचा फायदा ब्रिक्समधील सर्व सदस्य देशांना होणार आहे. दुसरा पैलू आहे भौगोलिक व राजकीय. जगातील सर्वांत मोठा भूभाग असलेला रशिया, सर्वाधिक लोकसंख्या असणारा चीन आणि दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या व सर्वांत मोठी लोकशाही असणारा भारत असे तीन मोठे देश ब्रिक्समध्ये एकत्र आहेत. याने ब्रिक्सची ताकद वाढणार आहे. येणाऱ्या काळात ब्रिक्सचा अधिक विस्तार होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**तीव्र प्रतिक्रिया :** दोन वर्षांपूर्वी ब्रिक्सचे आयोजन ब्राझीलमध्ये करण्यात आले होते. त्यानंतर राष्ट्रपती ट्रम्प यांनी थयथयाट केला होता. डॉलरला शह देण्याचा प्रयत्न ब्रिक्स देश करीत आहेत हा त्यांचा मुख्य आक्षेप होता. डॉलरला शह देण्याचा प्रयत्न अमेरिका मुळीच खपवून घेणार नाही. ब्रिक्सने नवे चलन वगैरे काढण्याचा प्रयत्न करू नये असे ट्रम्प यांनी बजावले होते. युरोपमधील देशांनी ज्याप्रमाणे काही वर्षांपूर्वी युरो नावाचे चलन बाजारात आणले, त्याच धर्तीवर ब्रिक्स देश नवे चलन बाजारात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत असा अहवाल ट्रम्प यांना देण्यात आला होता. कारण चीन व रशिया या दोन देशांशी अमेरिकेचा आर्थिक संघर्ष सुरू आहे. अमेरिकेने रशियावर आर्थिक निर्बंध लावले असून रशियाची अब्जावधी रुपयांची संपत्ती गोठविण्यात आली आहे. रशियाच्या अर्थव्यवस्थेवर याचे दुष्परिणाम दिसणे सुरू झाले आहे. हीच स्थिती इराणची आहे. इराणची अब्जावधी रुपयांची संपत्ती अमेरिकेने गोठवून ठेवली आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी रशिया-चीन नवे चलन बाजारात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि भारतही त्यात सामील झाला आहे असे ट्रम्प यांना वाटत होते. भारताने लगेच याचा इन्कार करून योग्य तो संदेश अमेरिकेला दिला होता. तेव्हा ते प्रकरण तेथेच मिटले होते.

**आता रशियाचे तेल :** राष्ट्रपती ट्रम्प यांच्या मनात भारताच्या विरोधात असंतोष खदखदत आहे. त्याची वेगवेगळी कारणे आहेत. त्याचा उल्लेख याठिकाणी करता येणार नाही. ट्रम्प यांनी रशियाकडून भारत आयात करीत असलेल्या कच्च्या तेलाबाबत आपली नाराजी नोंदविली आहे. तो रशियाही ब्रिक्स संमेलनात उपस्थित होता. थोडक्यात रशियाच्या तेलाने ट्रम्प यांच्या भारतविरोधी भूमिकेचा जणू भडका उडाला आहे.

**ब्रिक्सनंतर ट्रम्प काय करतील ? :** हजारो भारतीय युवक अमेरिकेत आहेत याची ट्रम्प यांना माहिती आहे. त्यांनी याबाबत काही प्रतिकूल निर्णय घेतले आहेत. ते आणखी किती व कोणते भारतविरोधी निर्णय घेतील हे येणाऱ्या काळात दिसणार आहे.

**बांगलादेश अनुपस्थित :** ब्रिक्स संमेलनात बांगलादेशची अनुपस्थिती मात्र भारतासाठी योग्य संकेत देणारी नाही. चीनच्या सांगण्यानुसार बांगलादेशने हा निर्णय घेतला आहे हे उघड आहे. चीन हा नेहमीच दुहेरी भूमिका वठवीत आला आहे. त्यामुळे जिन पिंग यांच्या उपस्थितीने भारताने हुरळून जाण्याचे कारण नाही. ■

## निमित्त

**रमेश सातपुते**

# विदेशातील श्रीगणेश प्रतिमा

**वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभः।।**
**निर्विघ्नं कुरु मे देवः सर्वकार्येषु सर्वदा ।।**

श्रीगणपती बाप्पा ! अखिल भारतातील भक्त गणातील एक लाडके दैवत. भारतभर बाप्पाची अनेक मंदिरे व वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा सर्वश्रुत आहेतच. असा हा सिद्धिविनायक भारताच्या सीमा ओलांडून विश्वभर विभिन्न माध्यम, रंग, रूपात, स्वरूपात स्वतःचे अस्तित्व टिकवून आहे. नेपाळ, थायलंड, इंडोनेशिया, तिबेट, ब्रह्मदेश, चीन, श्रीलंका, जपान, जावा, सुमात्रा, व्हिएतनाम, म्यानमार, बाली, बोर्निओ, अफगणिस्तान, कंबोडिया, मेक्सिको अशा जगभरातील विभिन्न स्थानी त्या त्या प्रदेशातील वैशिष्ट्य भूषण करीत निर्मित श्रीगणेशाच्या मूर्ती व मंदिरे अस्तित्वात आहेत. इतर राष्ट्रांत स्थापित पुरातन संग्रहालयात जसे- इंग्लंड, फ्रान्स तसेच अमेरिकेतील न्यूयॉर्क स्थित ‘श्री महावल्लभ गणपती’ हे अमेरिकेतील सर्वांत मोठे व नावाजलेले गणेश मंदिर होय. उल्लेखित काही राष्ट्रांमधील श्री विघ्नहर्त्याच्या मूर्ती, प्रतिमा, त्यांची विभिन्न रूपे यांचा परिचय करून घेऊया.

**नेपाळातील हेरंब :** भारताचे शेजारी राष्ट्र नेपाळ या देशात भाविक श्रीगणेशाची मोठ्या श्रद्धेने पूजा करतात. तेथे श्री गजाननाची हेरंब प्रतिमा विशेष लोकप्रिय होय. हेरंब पंचमुखी म्हणजे चार दिशांना चार व माथ्यावर एक अशी पाच मुखे, ज्याच्या प्रत्येक मुखाच्या कपाळावर एक तिसरा डोळा असून बारा भुजाधारी व श्री शक्तिदेवते समवेत उभ्या स्थितीतील हेरंब यांचे एक पाऊल सिंहावर, तर दुसरे पाऊल मूषकावर आहे.

**ब्रह्मदेश :** ब्रह्मदेशात बौद्ध धर्म अकराव्या शतकाच्या मध्यानंतर जरी पोहोचला असला, तरी हिंदू धर्म त्याच्या कितीतरी आधीच तेथे अस्तित्वात होता. तेथे स्थित पागान येथील मंदिरात पाषाणात कोरलेल्या चतुर्भुज श्रीगणेशमूर्तीच्या बैठकीवर समोरच्या बाजूस मगर, तर डाव्या व उजव्या बाजूस कासव व मच्छ कोरलेले आहेत.

**श्रीलंका :** भारताच्या दक्षिणेकडील शेजारी राष्ट्र श्रीलंकेत १९३५ साली निदर्शनास आलेल्या एका बौद्ध स्तुपावर श्रीगणेश मूर्ती आढळली असून कोलंबोपासून १५० मैलावरील कदरगाम येथील सुब्रम्हण्यम श्रीगणपतीचा भाऊ कार्तिकेय देवाच्या मंदिरात स्थित श्रीगणेशाच्या काळ्या पाषाणातील मूर्तीची इतर धर्मीय देखील भक्ती भावनेने पूजन करतात.



इंडोनेशिया येथील श्रीगणेश मूर्ती

**इंडोनेशिया :** आग्नेश आशियात अथांग महासागरात जावा, सुमात्रा, बाली, बोर्निओ प्रस्तुत समूहाला इंडोनेशिया म्हणून संबोधिले जाते. तेथे सर्वदूर भारतीय संस्कृतीचे अवशेष आढळतात. जावाचे संस्कृत नाव यवद्वीप, जावामधील दिवांग पठारावर श्रीगणेशाची पाषाण मूर्ती आहे. ती जावातील अतिप्राचीन मूर्ती म्हणून समजली जाते. मूर्तीच्या अंगावर अनेक अलंकार असले तरी मस्तकावर मुकुट मात्र नाही. बालीमधील उभ्या श्रीगणेश मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे मूर्तीच्या देहावर विपुल सर्प असून सोंड देखील सर्पाकृती आहे. इंडोनेशिया हा विश्वातील एक मोठा मुस्लिम धर्मीय प्रजा आणि राज्यकर्त्यांचा देश. या देशाच्या २०००० रुपये मूल्याच्या चलनी नोटेवर बांडुंग शहरातील प्राचीन मंदिरातील ‘जालन गणेशा’ची प्रतिमा मुद्रित केली गेली. इंडोनेशिया सरकारच्या वतीने तेथील तत्कालीन वित्तमंत्र्यांनी या नोटे संदर्भात केलेले निवेदन अत्यंत महत्त्वाचे होय. वित्तमंत्र्यांचे निवेदन होते- बांडुंग नगरीतील ‘जालन गणेशा’ हा आमच्या राष्ट्रातील प्राचीन संस्कृतीतील विघ्नहर्ता देवता आहे.

**अफगणिस्तान-गांधार :** अफगणिस्तानला प्राचीन काळात गांधार देश असे संबोधिले जात होते. तेथे काही वैशिष्ट्यपूर्ण श्रीगणेश प्रतिमा आढळल्या आहेत. यापैकी गर्देज नगरीत प्राप्त श्रीगणेशाची मूर्ती दोन फूट उंच व सहा फूट रुंद चतुर्भुज असून गळ्याभोवती सुंदर माला कोरण्यात आली आहे. सकरघाट येथे उत्खननात प्राप्त उभ्या मूर्तीच्या पायाशी रिद्धि सिद्धी विराजमान आहेत.

**इंडोचायना - व्हिएतनाम :** कंबोडिया (कम्बुज), लाओस, चंपा या प्रदेशांच्या संयुक्तपणे निर्माण झालेल्या इंडोचायना. तेथे उत्खननात अनेक लहान श्रीगणेश प्रतिमा सापडल्या आहेत. कंडेल नगरीतील एका प्राचीन संग्रहालयात चार मस्तके धारण केलेली श्रीगणेश प्रतिमा जतन करून ठेवली आहे.

**सायबेरिया :** रशियातील एक महत्त्वाचा प्रांत सायबेरिया ! हे भारतीय संस्कृतीचे प्राचीनतम केंद्र मानले जाते. तेथील रहिवाशांवर भारतीय संस्कार असल्यामुळे त्यांनी भारतीय धार्मिक ग्रंथांचे भाषांतर केले असून १०१ स्तूपांच्या ग्रंथ संग्रहालयातून संस्कृतवरून भाषांतरित केलेली अशी १००० पवित्र हस्तलिखिते जतन करून ठेवली आहेत, ज्यात १४ पोथ्या खास श्रीगणेश स्तवनावर केंद्रित आहेत.

**चीन :** येथे श्रीगणेशाच्या बहुतांश प्रतिमा या द्विभुजी आढळतात. चीनमधील तुंग सिएन येथील डोंगर कोरून घडविलेल्या मंदिरात श्रीगणेश मूर्ती पाषाणात कोरलेली आहे.

**जापान :** येथे श्रीगणेशाची आगळीवेगळी अशी मूर्ती आढळते. या मूर्तीत दोन गजमुखी दैवत एकमेकांस आलिंगन देत असल्याचे दर्शविले आहे. यास ‘कांगितेन’ म्हणून संबोधिले जाते. ‘निओ’ या तेथील दैवताचे या प्रतिमेशी बरेच साम्य दिसते.

**तिबेट :** तिबेटात श्रीगणेशाचे बंधू महाकालला बहुमान्यता असून गजाननाला दैत्यापासून रक्षण करणारी शक्तिशाली देवता मानली गेली आहे.

**थायलंड सयाम :** या राष्ट्राचे रहिवासी प्रामुख्याने मंगोल (मंगोलियन) वंशीय आहेत. परंतु त्यांची संस्कृती आर्य संस्कृतीशी जवळीक साधते. तेथे श्रीगणेश दैवत अत्यंत प्रिय आहे.

विश्वातील युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व आफ्रिका या प्रदेशांमध्ये संग्रहालयांमध्ये श्रीगणेशाच्या विभिन्न रूपातील, स्वरूपातील आसनाधीन मूर्ती, प्रतिमा जतन-संवर्धन करून प्रदर्शित केलेल्या आढळतात. असे आहेत आपले लाडके श्रीगणेश. ■

९४२१७०५३८१

## कानोसा

**डॉ. अमोल पुसदकर**

# दुटप्पी न्याय नको

आज सर्वत्र भक्तांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन होत आहे. गणपती हा विघ्नहर्ता आहे. देश, धर्म, संस्कृती यावरील विघ्नांचे सुद्धा त्याने हरण केले पाहिजे अशीच भक्तांची कामना आहे. या वेळेसचा गणेशोत्सव हा डीजेबंदीच्या वादाचे गालबोट लावून आलेला आहे. डीजे असो वा नसो गणेशभक्तांचा जल्लोष आणि उत्साह कायम राहणार आहे.

या गणेशोत्सवाच्यापूर्वी विनाकारण डीजेचा वाद उभा करण्यात आला. ज्यांना डीजे नको आहे त्यांनी न्यायालय, पोलिस आणि प्रशासन यांची मदत घ्यायला पाहिजे होती. पोलिस पोलिसांचे काम करतील, समाज सुद्धा डीजेबंदीचा सकारात्मक विचार करेल. परंतु डीजेचा आवाज हा निशाण्यावर आहे, की हिंदू धर्मीयांचा गणेशोत्सव निशाण्यावर आहे, अशा पद्धतीचा प्रश्न या वादामुळे निर्माण झालेला आहे. आपल्या समाजातील जे डावे आणि वामपंथी विचारांचे लोक आहेत, जे हिंदू धर्म अजिबातच मानत नाहीत, ते सातत्याने हिंदू धर्मालाच लक्ष्य करीत असतात. ते अहिंदू लोकांना किंवा त्यांच्या प्रथांना लक्ष्य करत नाहीत, कारण अहिंदू लोक हे अनेक वेळा आक्रमक होतात आणि त्यामुळे हे लोक त्यांच्या विरोधात एकही शब्द बोलण्याची हिंमत करत नाही. जिवंत बकरीला मारण्यापेक्षा केकची बकरी करावी असा विचार एकही पुरोगामी कधीच मांडत नाही. गणेशोत्सव वर्षातून एकदा येतो परंतु सकाळ, संध्याकाळ कर्कशपणे ओरडणारे भोंगे बंद करावे, असे हे लोक कधीच म्हणत नाही. यावरून यांचा विरोध हा हिंदू विरोध आहे, हे लक्षात येते. प्रशासन सुद्धा डीजेचा न्याय भोंग्यांना कधी देणार हा सुद्धा प्रश्न आहे. समाज माध्यमांनी सुद्धा गणेशोत्सवाच्या डीजेला जेवढी प्रसिद्धी दिली, तेवढी भोंग्यांना दिली नाही. हिंदू धर्मामध्ये अनेक चालीरीती आहेत. त्या शेकडो वर्षांपासून सुरू आहेत. त्यातील अनेक चालीरीतींमध्ये काही दोष सुद्धा निर्माण होत असतात. पण समाजातील अनेक लोक या दोषांच्याबाबत सुद्धा जनजागृती करून या दोषांना कसे घालवून देता येईल, यासाठी समाज जागरण करीत असतात. एखादी गोष्ट समाज आनंदाने स्वीकारतो, तर एखादी गोष्ट समाज कुरकुरत स्वीकारतो; परंतु हळूहळू सुधारणा होत जाते. सामाजिक सुधारणा हा वेगळा विषय आहे आणि गणेशोत्सवच बंद केला पाहिजे हा अतिशय टोकाचा आणि चुकीचा विषय आहे.

कोण कुठला एखादा माणूस रातोरात प्रचार माध्यम त्याला स्टार बनवून टाकतात. मग तो म्हणतो की, ज्या काळात लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला, त्यावेळेला त्याची काय आवश्यकता होती, हे मला माहीत नाही; परंतु आता त्याची आवश्यकता संपलेली आहे. गणपतींना आपापल्या घरामध्ये पुन्हा आसनस्थ करायची वेळ आलेली आहे. ती व्यक्ती म्हणते की मी नास्तिक आहे. यांना दुर्गादेवीच्या मूर्तीला दगड फेकून मारलेले चालतात, पण एखाद्या माणसाला कोणी चापट मारलेली चालत नाही. ज्यांनी चापट मारली त्याचा निषेध करायला लगेच पुरोगामी सरसावतात. कोणाला चापट मारणे हे जर कायद्याचे उल्लंघन आहे तर लाखो लोकांच्या श्रद्धास्थानांवर अपमानजनक बोलणे किंवा त्यांच्यावर केलेला हल्ला हा सुद्धा कायद्याचा भंगच आहे. त्यामुळे दोन्ही पण दंडनीय असले पाहिजे.

दुसरा विषय असा आहे की, लाखो लोक ज्याला आपले दैवत मानतात, त्याच्या आगमनाची तयारी मूर्तिकार काही महिने आधीपासूनच करतात. बाजारामध्ये भाजी विकणारे, सजावटीच्या वस्तू विकणारे, पूजा साहित्य विकणारे, वाहतूकदार असे सर्वच गणपतीच्या आगमनाची प्रतीक्षा करतात. अगदी खेड्यापाड्यांमध्ये राहणारे वृद्ध आई-वडील शहरातील आपली मुले गणपतीच्या निमित्ताने गावी येतील याची वाट बघत गणेशोत्सवाची प्रतीक्षा करीत असतात. त्यामुळे समाजातल्या नास्तिक लोकांनी या उत्सवाचे स्वागत नाही केले तरी चालेल; पण उत्सवाचा विरोध करून सामाजिक शांततेचा भंग करू नये.

प्रशासनाने सुद्धा निशाणा डीजेवर आहे की हिंदू धर्मीयांवर आहे की सामाजिक एकोप्यावर आहे, याचा शोध घेतला पाहिजे. नाहीतर आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी अशा पद्धतीची परिस्थिती होईल. डीजेचा आवाज बंद करणे किंवा कमी करण्यासाठी सर्व अधिकारी लावले जातील आणि सामाजिक एकोपा नष्ट करणारे कायदा आणि सुव्यवस्था बिघडवत राहतील, यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. डीजेबंदी हा गणेश उत्सवाशी निगडित विषय होता. गणेशोत्सवामध्ये विशेषतः तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. आज देशामध्ये विविध ठिकाणी पेपरफुटीच्या आणि वेगवेगळ्या विषयांवर आधारित तरुणांची प्रदर्शने होताना दिसतात. या सर्व पृष्ठभूमीवर ज्यांना समजावून सांगायचे आहे ते तरुण आहे. त्यामुळे अशा पद्धतीचा एखादा निर्णय घेण्यापूर्वी, गणेशोत्सव मंडळांशी सकारात्मक संवाद होणे गरजेचे होते. पुढील वेळेस गणेशोत्सवांना परवानगी देताना तुम्ही डीजेबद्दलची आपली अट आधीच टाका, म्हणजे यामुळे सामाजिक तेढ निर्माण होणार नाही. हाच नियम यानंतर सर्वांनाच लावा. म्हणजे कोणत्याही धर्मामध्ये समाजामध्ये आमच्यावर अन्याय होतो आहे अशी असंतोषाची भावना निर्माण होणार नाही. अनेक नेत्यांचा आणि हिंदू समाजातील अनेक चांगल्या लोकांचा डीजेबंदीला पाठिंबा आहे. त्याचबरोबर अनेकांचे असेही म्हणणे आहे, ही जी बंदी आता तुम्ही हिंदूंच्या उत्सवाला लागू करत आहात, ती तुम्ही इतर धर्मीयांना सुद्धा लागू करू शकाल का? कारण इतर धर्मीय हे अनेक वेळा हिंसेचा आधार घेतात आणि यांचे आंदोलन हिंसक झाले की सरकार दोन पावलं मागे जाते, हा अनुभव आहे.

दहीहंडीमध्ये जाऊन डीजे बंद करू शकण्याची हिंमत करणारे प्रशासन विशिष्ट धर्माच्या वस्तीमध्ये जाऊन डीजे बंद करण्याची हिंमत दाखवतील का? हा मुख्य प्रश्न आहे. आणि तसे ते करून दाखवू शकणार नाही, हा जनतेच्या मनामध्ये विश्वास आहे. पुरोगामी लोकांनी सुधारणेच्या नावाखाली पुन्हा एकदा हिंदूंचे सण, उत्सव आणि देव यांना लक्ष्य करण्याचे काम सुरू ठेवले. सर्व सामान्य माणसाला हे राजकारण काही फारसे लक्षात येतेच, अशातला भाग नाही. त्यामुळे तो सुद्धा डीजेबंदीच्या नावाखाली होणाऱ्या आंदोलनामध्ये सहभागी होतो. मग डीजेविरोधी कोण आणि हिंदूविरोधी कोण हे लक्षात येणे कठीण होते. समाजाने निशाणा डीजेवर आहे की हिंदू धर्मावर, हे सुद्धा ओळखण्याची प्रगल्भता दाखवली पाहिजे.

भगवान गणेश विद्येची देवता आहे. प्रगल्भता आणि सामाजिक चातुर्य हिंदू समाजाला भगवान गणेश प्रदान करो, हीच गणरायाच्या आगमनाच्या निमित्ताने प्रार्थना आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### कर्ता करविता तूच गणराया

आज श्रीगणेशाचे आगमन होणार आहे. तो गणाधीश आहे. अधिपती आहे. संकटांचे निवारण करणारा संकटमोचक आहे. गणराज आहे. आपल्यावर छत्र ठेवतो. चिंता दूर करणारा चिंतामणी आहे. आपल्याला वर देणारा वरदविनायक आहे. त्याचे वाहन मूषक आहे. बाप्पांना मोदक खूप आवडतात. जास्वंद व कण्हेराची फुले खूप प्रिय आहेत. दाह कमी करायला बाप्पाला दूर्वा वाहाव्या. शमीपत्र व केवडा प्रिय आहे. तो कर्ता करविता आहे. तोच रक्षणकर्ता आहे. तो बुद्धिदाता आहे. त्याचा उत्सव करताना तोच सगळ्यांना चांगली बुद्धी देईल. छान सनई लावून त्याचे स्वागत करावे. मंगलमय वातावरण ठेवावे. आपण सगळे त्याची प्रतीक्षा करतो आहोत. चला तर श्रीगणेशाचे स्वागत करूया.

**अंजली पळणीटकर**/ नागपूर

■■■

### हरितालिका व्रत : माहिती आणि माहात्म्य

हरितालिका हा सण गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी (भाद्रपद शुद्ध तृतीया) अत्यंत उत्साहात आणि श्रद्धेने साजरा केला जातो. या दिवशी सवाष्ण स्त्रिया आणि कुमारिका अखंड सौभाग्य आणि मनासारखा वर मिळवण्यासाठी कडक उपवास करतात.

पौराणिक कथेनुसार, देवी पार्वतीने महादेवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती.



तिने हेच व्रत करून शिवाला प्राप्त केले होते. तेव्हापासून स्त्रिया आपल्या वैवाहिक जीवनाचे रक्षण, अखंड सौभाग्य आणि इच्छित वर मिळवण्यासाठी हे व्रत करतात. या दिवशी सकाळी लवकर मंगलस्नान करून पार्वती आणि तिच्या सखीच्या मूर्तीची, तसेच मातीपासून बनवलेल्या शिवलिंगाची स्थापना केली जाते. या व्रतामध्ये विशेषतः सोळा प्रकारची पत्री (विविध वनस्पतींची पाने) शिवपिंडीवर वाहण्याचे मोठे महत्त्व आहे. यादरम्यान दिवसभर निरंकार उपवास केला जातो आणि रात्री भजन-कीर्तन करत जागरण केले जाते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उत्तरपूजा करून शिवपिंडी आणि मूर्तीचे पाण्यात विसर्जन केले जाते आणि उपवास सोडला जातो. हरितालिकेच्या पूजेत १६ नाममंत्रांचे पठन करत १६ प्रकारच्या पत्री (पाने) शिवपिंडीवर वाहिल्या जातात. या पूजेमुळे वातावरणात चैतन्य आणि शक्तीची स्पंदने पसरतात. त्यामुळे मनाला आणि शरीराला आध्यात्मिक ऊर्जा मिळते.

थोडक्यात सांगायचे तर, हरितालिका हे केवळ एक व्रत नसून स्त्रीच्या श्रद्धेचा, त्यागाचा आणि मानसिक आत्मबल वाढवण्याचा एक सुंदर उत्सव आहे. ■

**वर्षा आवदे**/ नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

RNI Reg.No 46878/87

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गणपती बाप्पा, लातूरकरांना हेल्मेट वापरण्याची सुबुद्धी दे !

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात लातूर पोलिसांनी यंदा गणपती बाप्पांकडे एक आगळेवेगळे आणि सामाजिक संदेश देणारे साकडे घातले आहे. गणपती बाप्पा, लातूरकरांना हेल्मेट वापरण्याची सुबुद्धी दे! अशी भावनिक साद लातूर पोलिसांनी बाप्पांच्या चरणी घातली आहे.

लातूर जिल्ह्यात वाढत असलेले रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणारी जीवितहानी ही चिंतेची बाब बनली आहे. विशेषतः दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर न केल्यामुळे अपघातांमध्ये गंभीर दुखापत होण्याचे तसेच जीवितहानीचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर लातूर पोलीस विभागाने हेल्मेट वापराबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती सुरू केली होती. गेल्या काही महिन्यांपासून लातूर पोलिसांकडून विविध माध्यमांतून नागरिकांना हेल्मेट वापरण्याचे आवाहन करण्यात येत होते. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्वतः याबाबत सातत्याने जनजागृती केली. नागरिकांनी हेल्मेटचा वापर करावा, हा केवळ पोलिसांचा नियम नसून प्रत्येकाच्या जीवनाच्या सुरक्षेशी संबंधित विषय आहे, हे नागरिकांना पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. हेल्मेट हे ओझे नसून कुटुंबाचे सुरक्षा कवच आहे, हा संदेश लातूर पोलिसांकडून नागरिकांपर्यंत पोहोचविला जात आहे. एखाद्या व्यक्तीने हेल्मेट घातले म्हणजे तो केवळ स्वतःचेच नव्हे, तर त्याच्यावर अवलंबून असलेल्या संपूर्ण कुटुंबाचे संरक्षण करीत असतो. त्यामुळे प्रत्येक दुचाकीस्वाराने घराबाहेर पडताना हेल्मेटला वाहनाइतकेच महत्त्व द्यावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



# विविध वृत्त.....

## श्री मुक्तेश्वर विद्यालयात १६०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

औसा दि. १४ सप्टेंबर : श्री मुक्तेश्वर विद्यालय, औसा येथे आज १६०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा जनजागृती करण्यात आली. सायबर वॉरियर योगिता जाधव आणि सायबर वॉरियर प्राजक्ता बोरूळे यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद लिंक, वैयक्तिक माहितीची सुरक्षितता तसेच सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. माशाळकर यांनी विशेष सहकार्य केले. तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सत्राला उत्तम प्रतिसाद दिला.

मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना एकाच वेळी सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन मिळाल्याने हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

## डिजिटल युगात सावधगिरीच खरी सुरक्षा! मराठवाडा रेल कोच फॅक्टरीत सायबर जनजागृती



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ सप्टेंबर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मराठवाडा रेल कोच फॅक्टरी, लातूर येथे कर्मचारी व सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र घेण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर नरेश पंडित व अविष्कार कांबळे यांनी ऑनलाइन फसवणूक, फिशिंग व संशयास्पद लिंक, मजबूत पासवर्ड, ओटीपी सुरक्षा, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, ई-मेल व मोबाईल सुरक्षा तसेच सुरक्षित डिजिटल व्यवहाराबाबत मार्गदर्शन केले.

सायबर फसवणूक टाळण्यासाठी अनोळखी लिंक व संदेशांपासून सावध राहणे आणि गोपनीय माहिती कोणासोबतही शेअर न करण्याचे आवाहन करण्यात आले. फसवणूक झाल्यास १९३० या सायबर हेल्पलाइनवर तातडीने संपर्क करण्याची माहितीही देण्यात आली.

फॅक्टरीतील कर्मचारी व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. त्यांच्या शंकांचे निरसन करून सुरक्षित डिजिटल वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## महसूल लोक अदालतचे लातूर जिल्ह्यात ३० सप्टेंबर रोजी आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ सप्टेंबर : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनींशी संबंधित प्रलंबित असलेले विविध महसुली दावे व अपीले सामंजस्याने व कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी लातूर जिल्ह्यात येत्या ३० सप्टेंबर २०२६ रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून तसेच त्यांच्या सामाजिक न्याय व शेतकरी कल्याणाच्या मूळ विचारांना स्मरून हे अभियान राज्यभरात राबविण्यात येत आहे. महसुली दाव्यांमध्ये एका स्तरावर निकाल लागल्यानंतर निकाल विरोधात लागलेले पक्षकार वरिष्ठ न्यायालयात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात, ज्यामुळे हे दावे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर महसुली न्यायालयात प्रलंबित दावे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने व कायदेशीर तडजोडीने निकाली काढल्यास अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताण कमी होऊन नागरिकांची मोठी बचत होणार आहे. या अभियानांतर्गत दर तीन महिन्यांतून एकदा मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकारी अशा सर्व स्तरांवर लोक अदालतीचे नियमित आयोजन केले जाणार आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका, उपविभाग व जिल्हा स्तरावर बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत महसूल लोक अदालतीचे आयोजन केले जाईल. त्यापूर्वी पक्षकारांना योग्य ते मार्गदर्शन व कायदेशीर सल्ला मिळावा यासाठी सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय व सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयांच्या ठिकाणी विधी सल्लागारांच्या सहकार्याने विशेष समुपदेशन केंद्र कार्यान्वित केले जाणार आहे. ज्या अर्धन्यायिक न्यायालयात दावा प्रलंबित असेल तेथे दोन्ही पक्षकारांनी संयुक्त स्वाक्षरीसह आणि आपल्या वकिलांमार्फत विहित 'प्रपत्र-अ' मधील नमुन्यात किमान पाच दिवस आधी तडजोड अर्ज व कायदेशीर तडजोडनामा सादर करणे आवश्यक राहील. जर एखादा पक्षकार आपले अपील परत घेणार असेल तर तसा अर्ज दाखल करावा लागेल. प्राप्त अर्जांची प्राथमिक छाननी करून दोन्ही पक्षांच्या संमतीची खात्री झाल्यानंतर महसूल लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या उपस्थितीत अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढले जाईल, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सांगण्यात आले आहे

## लातूर जिल्ह्यात दुष्काळग्रस्त जाहीर करा
## आ. अभिमन्यू पवारांची महसूल, मदत - पुनर्वसन व पालकमंत्र्यांकडे मागणी



तभा वृत्तसेवा

ओसा दि.१४ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पाणी व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संपूर्ण लातूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत द्यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील तसेच लातूरचे पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे केली आहे.

बुधवारी आमदार पवार यांनी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवार दि.९ रोजी भेट घेऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत जाहीर करण्याची मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड तसेच औसा व निलंगा तहसीलदारांशी संपर्क साधून जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला.या आढाव्यात सोयाबीन, तूर, कापूस, उडीद आणि मूग या खरीप पिकांचे सरासरी ८५ टक्के नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील जलसाठ्याची स्थितीही चिंताजनक आहे. मांजरा प्रकल्पात २० टक्के, तेरणा प्रकल्पात २० टक्के, तर जिल्ह्यातील इतर मध्यम प्रकल्पांत सरासरी केवळ ८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी काळात पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

या पार्श्र्वभूमीवर आमदार पवार यांनी संबंधित मंत्र्यांशी संपर्क साधून जिल्ह्यातील दुष्काळाच्या तीव्रतेची माहिती दिली. संपूर्ण लातूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा आणि हा विषय आगामी मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्र्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला.

## विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर जिल्ह्यात १० हजार ९७७ केसेस

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ सप्टेंबर : : लातूर जिल्ह्यात वाढते अपघाताचे प्रमाण आणि त्यामध्ये होणारी जीवितहानी कमी करण्याच्या उद्देशाने लातूर पोलीस विभागाच्या वतीने दि. १ सप्टेंबर २०२६ पासून हेल्मेट सक्तीचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानंतर विनाहेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या वाहनचालकांवर सातत्याने कारवाई करण्यात येत असून, दि. १३ सप्टेंबर रोजी एकाच दिवशी ९१९ केसेस करण्यात आल्या आहेत. तर हेल्मेट सक्ती सुरू झाल्यापासून आतापर्यंत विनाहेल्मेट दुचाकीस्वारांवर एकूण १० हजार ९७७ केसेस करण्यात आल्या आहेत. लातूर जिल्ह्यातील वाढते अपघात आणि त्यातून होणारी जीवितहानी रोखण्यासाठी हेल्मेट वापराला पर्याय नाही. दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर हा केवळ पोलिसांच्या कारवाईपासून बचाव करण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविणे आवश्यक आहे. हेल्मेट वापरण्याची सवय प्रत्येक दुचाकीस्वाराच्या अंगवळणी पडणे ही काळाची गरज आहे. लातूर पोलीस विभागाच्या वतीने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्च २०२६ पासून हेल्मेट वापराबाबत विविध माध्यमांतून सातत्याने जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांना हेल्मेटचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रसारमाध्यमांद्वारे आवाहन, जनजागृती उपक्रम तसेच विविध पद्धतींचा अवलंब करण्यात आला. हेल्मेट वापरल्यामुळे अपघाताच्या वेळी डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतींचा धोका कमी होऊ शकतो, हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. मात्र, या सातत्यपूर्ण जनजागृतीनंतरही जिल्ह्यात हेल्मेट वापरणाऱ्या दुचाकीस्वारांचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे वाढले नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत लातूर जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने हेल्मेट सक्ती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## भाजपच्या संवाद कार्यालयात भक्तीभावाने गणरायाची प्रतिष्ठापना
## युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते विधिवत पूजन



तभा वृत्तसेवा

लातूर दि.१४ सप्टेंबर : लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात गणेशोत्सवानिमित्त भक्तीमय वातावरणात श्री गणरायाचे आगमन झाले. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते विधिवत पूजा-अर्चा करून गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणपती बाप्पाचे भाजपाच्या संवाद कार्यालयात भक्तीमय वातावरणात आगमन झाले. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया अशा जयघोषाने संवाद कार्यालय भक्तिमय झाला होता. युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते विधिवत पूजा करून आरती करण्यात आली. याप्रसंगी गणरायाच्या चरणी सर्वांच्या सुख-समृद्धीसह पावसासाठी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी भाजपचे नेते आ. रमेशआप्पा कराड, ज्येष्ठ मार्गदर्शक विक्रमकाका शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गोडभरले, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, उद्योजक जगदीश कुलकर्णी, महेंद्र जाधवर, पत्रकार रामेश्र्वर बद्दर, अंकुश जाधव, एमडी मुळे, रामराव मोरे, भैरवनाथ पिसाळ, महादेव गुरुशेट्टे, श्रीमंत नागरगोजे, रमाकांत फुलारी, भगवात करमोडे, संजय डोंगरे, लक्ष्मण खलांग्रे, गोविंद कराड, नारायण राठोड, अमृत बोराडे, अभिजीत गोपाळगिरे, विनोद वाघमारे, गोपाळ मुंडे, दिलीप पाटील, संजय पुंडकरे, अजय दौंड, रवी सातपुते, नवनाथ मुरकुटे, प्रशांत देवगुंडे, पुंडलिक सूर्यवंशी, भागवत लहाने, सुरेश गिरी, नागनाथ डोके, हनुमंत चाटे, कुलदीप शिंदे, मनोज बाडगिरे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते, संवाद कार्यालयातील सर्व परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ८०० हून अधिक घरांमध्ये रोटरॅक्टने पोहोचवला 'इको-फ्रेंडली बाप्पा'

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ सप्टेंबर : पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा प्रसार व्हावा आणि गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा संदेश जनमानसात रुजावा, या उद्देशाने रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाउनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'गणपती कार्यशाळा ५.0' या उपक्रमाला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे हे पाचवे वर्ष असून, यंदा आयोजित करण्यात आलेल्या चार विविध कार्यक्रमांमधून ८०० हून अधिक नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यामुळे ८०० हून अधिक घरांमध्ये पर्यावरणपूरक बाप्पा पोहोचवण्याचा अनोखा उपक्रम रोटरॅक्टने यशस्वी केला.

यंदाच्या गणपती कार्यशाळेअंतर्गत चार ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पहिला कार्यक्रम पुरणमल लाहोटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड




टेक्नॉलॉजी, तर दुसरा कार्यक्रम एम.एस. बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज येथे घेण्यात आला.

तिसरा कार्यक्रम लातूर महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य कार्यक्रम स्टीम एज्युकेशन कॅम्पस, लातूर येथे उत्साहात पार पडला.

या चारही कार्यशाळांमध्ये सहभागी झालेल्या ८०० हून अधिक सहभागीदारांनी स्वतःच्या हाताने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा अनुभव घेतला. या माध्यमातून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींऐवजी पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर करण्याचा संदेश देण्यात आला.

या कार्यशाळेसाठी मार्गदर्शन करणारे प्रमुख कलाकार म्हणून सौ. मंजुषा कुलकर्णी बेंकाळकर, सौ. मंजुषा कुर्डुकर आणि श्री. रुपेश बाकमवार यांनी मोलाचे योगदान दिले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्लबच्या अध्यक्ष तनिक्षा बोरा, सचिव यश गंगर, जतिन वाताडे, प्रकल्प अध्यक्ष वेदांत मंदाडे आणि आदित्य लातूरे, श्री. ओमप्रकाश झुरळे यांच्यासह रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाउनच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

## आरोग्य विम्याबाबत राज्यात स्टार हेल्थकडून जनजागृती
## सर्वांसाठी विमा याकरिता पाठपुरावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ सप्टेंबर : वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी कुटुंबांसमोर दोन मुख्य चिंता तातडीने उभ्या असतात: दर्जेदार उपचारांची उपलब्धता आणि त्यानंतर येणारा आर्थिक ताण सांभाळण्याची क्षमता. अलिकडच्या वर्षांत भारतात आरोग्य विम्याचा विस्तार लक्षणीयरित्या झाला असला, तरी अनेक कुटुंबांना अजूनही आरोग्यावरील उपचारांसाठी स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करावा लागत आहे. यामुळे आर्थिक सज्जता हा संपूर्ण आरोग्य सुरक्षेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे.

याच उद्देशाने, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या भारतातील पहिल्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीने संपूर्ण महाराष्ट्रात महिनाभर राबवलेला आरोग्य विमा जागरूकता रोड शो यशस्वीरित्या पूर्ण केला. विशेष डिझाइन केलेल्या जागरूकता व्हॅनने पश्रि्चम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागात प्रवास केला. या मोहिमे दरम्यान ५० हून अधिक शहरांचा आणि नगरांचा प्रवास करत तीन लाखांपेक्षा जास्त व्यक्तींशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला.




या उपक्रमाबद्दल मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री. विजय अरोरा म्हणाले भारताचा आरोग्य विम्याचा प्रवास आता केवळ विमासंरक्षणाचा विस्तार करण्यापुरता मर्यादित राहिलेला नसून व्यक्तींमध्ये समज, विश्र्वास आणि आत्मविश्र्वास निर्माण करण्याविषयी आहे. या रोड शो च्या माध्यमातून, आम्ही शंकांचे निरसन केले आणि आरोग्य विम्यातील काही गुंतागुंतीच्या गोष्टी सोप्या करून सांगण्यास मदत केली. या संवादांनी समाजातील सर्व घटकांसाठी आरोग्य विमा समजून घेणे अधिक सोपे आणि सुलभ करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

या उपक्रमास भेट देणाजयांना टॉक टू स्टार ची देखील माहिती देण्यात आली, जी स्टार हेल्थ ची समर्पित सहाय्यसेवा आहे. ही सेवा पात्र पॉलिसीधारकांना नियोजित हॉस्पिटलायझेशनसाठी मदत करते, ज्यामध्ये हॉस्पिटल मध्ये दाखल होण्यापूर्वी नेटवर्क हॉस्पिटल्स, कॅशलेस प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि उपचार पद्धती समजून घेण्यास त्यांना साहाय्य केले जाते. रोड शो मध्ये कंपनीच्या होम हेल्थकेअर (एचएचसी) सेवेवर ही प्रकाश टाकण्यात आला.

भारतामध्ये आरोग्य सेवेच्या गरजा बदलत आहेत, तसतसे स्टार हेल्थ नाविन्यपूर्ण उत्पादने, तंत्रज्ञान-सक्षम आरोग्यसेवा, समुदाय सहभाग आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांद्वारे आपली सर्वांसाठी विमा' संकल्पना पुढे नेण्यासाठी कटिबद्ध आहे, ज्यामुळे भारतातील प्रत्येक कुटुंबासाठी दर्जेदार आरोग्य विमा अधिक सुलभ, समजण्याजोगा आणि समर्पक बनवता येईल.

## पाटील परिवाराने जपली चापोलीच्या पोळ्याची परंपरा



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १४ सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील चापोली येथे शेतकरी आणि बैलांच्या अतूट नात्याचे प्रतीक असलेला बैलपोळा सण पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. पाटील परिवाराने मानकरी म्हणून पारंपरिक पद्धतीने बैलांची मिरवणूक काढत गावातील मानाचे बैल फिरविण्याची जुनी परंपरा यंदाही जपली.

पारंपारिक वेशभूषेत सजविलेल्या बैलांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले. डॉ.पुंडलिकराव चाटे यांच्या हस्ते मानाचे तोरण तोडण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, पारंपारिक फेटे आणि विविध रंगांनी सजविलेल्या बैलांमुळे चापोलीतील वातावरण उत्साहाने भारून गेले होते.

बैल हा शेतकऱ्याच्या जीवनातील अविभाज्य साथीदार असून, वर्षभर शेतीच्या कामात साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळा साजरा केला जातो. आधुनिकतेच्या काळातही चापोलीकरांनी आपल्या पारंपारिक संस्कृतीचे आणि गावच्या मानाच्या परंपरेचे जतन करत बैलपोळ्याचा उत्सव उत्साहात साजरा केला.या वेळी शंकर पाटील, बाबुराव पाटील, माधव पाटील, राजू पाटील, व्यंकटेश पाटील,रमेश पाटील, नितीन पाटील, रमण पाटील,बाबासाहेब शिंदे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त अभिवादन



**परभणी,/प्रतिनिधी :** महानुभाव पंथाचे संस्थापक तथा मानवतेचा संदेश देणारे श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या पवित्र स्मृतीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार जनार्दन रेड्डी, अव्वल कारकून शरद मगर, अर्जुन कांदे, विश्वनाथ कनके आदी उपस्थित होते.

### महाडीबीटी १.० पोर्टल १५ सप्टेंबरपर्यंत कार्यान्वित प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज तातडीने निकाली काढण्याचे समाज कल्याण विभागाचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप) योजनेंतर्गत जिल्ह्यातील महाविद्यालयांकडे प्रलंबित असलेले शिष्यवृत्ती अर्ज तातडीने निकाली काढण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी महाडीबीटी १.० (जुने महाडीबीटी) पोर्टल दि. १० ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कार्यान्वित करण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालये तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या महाडीबीटी १.० पोर्टल लॉगिनवर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची तातडीने कार्यवाही पूर्ण करावी. महाडीबीटी १.० वरील शैक्षणिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ मधील प्रलंबित अर्जांची संबंधित संस्था व विभाग स्तरावर छाननी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर प्रलंबित अर्जांमधील कागदपत्रे, पात्रता, विद्यार्थ्यांची माहिती तसेच आवश्यक त्रुटींची पूर्तता करून पात्र अर्ज पुढील कार्यवाहीसाठी समाज कल्याण कार्यालय, परभणी येथे तातडीने (फॉरवर्ड करावेत) पाठवावेत. तसेच, विद्यार्थी स्तरावर अर्ज प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांशी संबंधित महाविद्यालयांनी तत्काळ संपर्क साधून आवश्यक त्रुटींची पूर्तता करून घ्यावी. महाडीबीटी १.० पोर्टलवर दि. १० ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नवीन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. नवीन अर्ज केवळ महाडीबीटी २.० पोर्टलवर स्वीकारले जातील. त्यामुळे महाडीबीटी १.० पोर्टलचा वापर प्रामुख्याने पूर्वीपासून प्रलंबित असलेल्या अर्जांची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी करावा. कोणताही पात्र अर्ज प्रलंबित राहणार नाही, याची सर्व संबंधित महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

#### पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची दुसरी यादी दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत जिल्ह्यातील २४ हजार ३७४ शेतकऱ्यांचा समावेश असून, पात्र लाभार्थ्यांनी कर्जमुक्तीचा लाभ मिळविण्यासाठी तातडीने आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि जिल्हा उपनिबंधक श्री. जगदाळे यांनी केले आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांची यादी लवकरच प्रसिद्ध होणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे

या योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही यादी कर्जमुक्तीची असून, यादीतील पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जबाकीची रक्कम दि. ३१ मार्च २०२६ रोजीची आहे. त्यानंतर म्हणजेच दि. १ एप्रिल २०२६ पासून आकारलेले व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी दि. ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी खातरजमा करून घ्यावी आणि त्यानंतर नजीकच्या आपले सेवा केंद्रावर आधार प्रमाणीकरण करून घ्यावे.तसेच राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांमधील काही लाभार्थी शेतकऱ्यांची दि. ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या हेअर कट धोरणानुसार संबंधित पात्र कर्जखाती निरंक करण्यात येणार आहेत.योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांमध्ये मयत झालेले तसेच वयस्कर आणि बोटांचे ठसे नोंदविण्यात अडचण येणारे लाभार्थी यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली () निर्गमित केली आहे. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे यादीत नाव असलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे.

### पूर्णवाद युवा फोरमतर्फे गणेशोत्सवानिमित्त भरगच्च कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यानगर येथील जीवनकला मंदिरातील उपासना गणेश मंडळाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने पूर्णवाद युवा फोरमच्यावतीने १४ ते २५ सप्टेंबर या दरम्यान भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. १४ सप्टेंबर रोजी श्रींची स्थापना, वेदमुर्ती प्रमोदशास्त्री कुलकर्णी व ब्रम्हवृंदांतर्फे वेदमंत्र जागर, १५ सप्टेंबर रोजी तीर्थक्षेत्र आळंदी येथील कु. ज्ञानेश्वरी सगळे व पुर्णेश्वरी सगळे यांच्या भजनसंध्येचा कार्यक्रम, १६ सप्टेंबर रोजी 'व्यवस्थेचेसाठी मानवा नियम' हा परिसंवाद होणार असून त्यात दैनिक दिलासाचे संपादक संतोष धारासूरकर, सेलू येथील उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, उद्योजक आदित्य देशपांडे, विधीज्ञ ॲड. आनंद देशपांडे व सामाजिक कार्यकर्ते शंकर देशमुख हे सहभागी असणार आहेत. २० सप्टेंबर रोजी सामान्यज्ञान व बुध्दीबळ स्पर्धा, सायंकाळी ७.३० वाजता गु.भ.प. रामनाथबुवा अय्यर यांचे किर्तन, २१ सप्टेंबर रोजी 'स्वेच्छा से स्वनियंत्रण जीवन' या विषयावर पूर्णवाद युवा फोरमचे केंद्रीय कार्यकारणी सचिव ॲड. अक्षय केळापुरे (यवतमाळ) यांचे व्याख्यान, २२ सप्टेंबर रोजी 'कर्तव्य, कर्तृत्व आणि आजचा युवक' या विषयावर जीवनकला मंडळाच्या सहसचिव ॲड. विनय कुलकर्णी यांचे व्याख्यान तर २३ सप्टेंबर रोजी 'नवागाव' या नाटकाची नाट्य प्रस्तुती अभिनेते किशोर पुराणिक आणि सहकाऱ्यांद्वारे केली जाणार आहे.



# ढोल ताशाच्या गजरात लाडक्या बाप्पाचे आगमन

## गणपती बाप्पा मोरया नावाचा गजर, नागरिकांची,मंडळाची विधिवत पुजा अर्चना

**परभणी,/प्रतिनिधी:-** शहरासह जिल्हयात लाडक्या बाप्पाचे मोठया हर्षोल्सात पावसाचे आगमनाविना गणरायाचे ढोल ताशाच्या गजरात आगमन झाले होते. यावेळी नागरिकांनी तसेच विविध गणेश मंडळाच्यावतीने लाडक्या बाप्पाची मुर्ती खरेदीसाठी सकाळपासूनच एकच गर्दी केली होती.

गेल्या कित्येक दिवसापासून लाडक्या बाप्पाच्या आगमनाची आपण सर्वच जण मोठया उल्हासाने वाट पाहत होतो. त्यामुळे हा दिवस कधी येतो अशी वाट सर्वच जण पाहून बसले होते. अखेर लवकरच म्हणजे सोमवार दि.१४ सप्टेंबर रोजी बाप्पाचे आगमन झाले होते. यावेळी सकाळपासून नागरिकांची गणरायाची आकर्षक अशी मर्ती खरेदी करण्यासाठी एकच गर्दी दिसून आलीहोती.




तसेच विविध अशा गणेश मंडळाच्यावतीने गेल्या दोन दिवसापासून बाप्पाची मुर्तीची ॲडव्हान्स बुकींग केली व आगमनाच्या दिवशी सायंकाळी ढोल ताशाच्या गजरात बाप्पाचे मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी शहरासह जिल्हयातील अन्य गावात पोलिसांचा मोठा असा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



## योगेश्वरी शुगरच्या २५ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन सोहळा उत्साहात



**पाथरी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील लक्ष्मीनगर लिंबा येथील योगेश्वरी शुगर इंडस्ट्रीज प्रा. लि. च्या सन २०२६-२७ च्या २५ व्या ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन सोहळा आज रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता कारखाना स्थळी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात यज्ञेश्वर रंगनाथ महाराज सेलुकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व पौरोहित्य अतुल जोशी खांडवीकर यांच्या मंत्रोच्चारात झाली. या शुभ प्रसंगी कारखान्याचे चेअरमन मा. रोहित भैया देशमुख साहेब व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उत्कर्षाताई देशमुख, एम.टी. नाना देशमुख, डायरेक्टर श्री. राहुल देशमुख, डॉ. अभिजीत देशमुख यांच्या शुभहस्ते बॉयलरचे अग्निप्रदिपन करण्यात आले. यावेळी कारखान्याचे प्रमोटर लक्ष्मीकांत घोडे, गंगाधरराव गायकवाड, सुदामरावजी सपाटे, टेक्निकल डायरेक्टर प्रकाश चांदगुडे, मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र पाटील, जनरल मॅनेजर राजकुमार तौर, वर्क्स मॅनेजर महादेव भंडारे, चीफ केमिस्ट नवनाथ चौधरी, चीफ अकौंटंट मुकेश रोडगे, मुख्य शेतकी अधिकारी रवींद्र भंडारी, लेबर ऑफिसर रामराव कदम, सुरक्षा अधिकारी गणेश वाघमारे, इन्चार्ज ईडीपी चैतन्य महाजन, केनयार्ड सुपरवायझर नामदेव वांद्रे, गुलाब पवार, सीनियर क्लार्क प्रशासन सोमेश्वर सिताफळे, वसुली इन्चार्ज संजय महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच यावेळी ऊस उत्पादक शेतकरी नागोराव आरबाड, पंचायत समिती माजी सभापती तुकाराम जोगदंड, माजी सभापती जि.प. परभणी सर्जेराव गिराम, सरपंच विटा कैलास आरवाड, सरपंच लिंबा विष्णू चव्हाण, सरपंच मुदगल लक्ष्मीकांत तिडके, सरपंच आनंदनगर विजय पवार, चेअरमन लिंबा बालासाहेब सहजराव,सरपंच नितिनराव निर्मळ, ऊस उत्पादक किरण घुमरे, बाबुराव दळवे, उत्कर्ष दळवे, मंकाजी शिंदे, माधवराव हरकळ, उत्तमराव आरबाड, संदिपान हरकाळ, मदनराव देंडगे, माजी सरपंच लिंबा शेख मुस्ताक, दत्ता धर्मे, अशोक दुगाने, नारायण राठोड, बन्सी पवार, संतोष रणेर, माणिक आरबाड, हरिभाऊ पवार, काशिनाथ गीते, भरत हरकाळ, राम कुलकर्णी, वसंत लाखे, कमलाकर कोपले, बबनराव सोळंके, विनोद देशमुख, मोहन देशमुख, कल्याण देशमुख, दिलीप काळे, भागवत देशमुख, पोलीस उपनिरीक्षक बापूराव राठोड यांच्यासह परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार, कामगार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परभणी शहरासह जिल्हयात पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरासह जिल्हयात पोलिसांचा गणपती बाप्पाच्या आगमनानिमित्त मोठा असा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरात सकाळी बाप्पाची आकर्षक मुर्ती खरेदीसाठी नागरिकांसह गणेश मडळाची मोठी गर्दी दिसून आली होती. यासह सायंकाळच्या सुमारास विविध अशा मिरवणूकांच्या माध्यमातून लाडक्या बाप्पाचे यावेळी हर्षोल्सात असे स्वागत करण्यात आले होते.

## परभणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर डॉ मोरे व डॉ चिद्रवार यांची नियुक्ती

**मानवत,/प्रतिनिधी-** ग्राहकांच्या अधिकाराचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली असून अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रांताध्यक्ष डॉ विलास मोरे यांची तर मानवतचे तालुकाध्यक्ष डॉ सचिन चिद्रवार यांची या समितीत अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी गुरुवारी ता १० शासनाने विहित केलेल्या निकषांच्या आधारे पात्र अर्जदाराची निवड करून जिल्हाभरातील विविध क्षेत्रातील एकूण २४ अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी व सचिव जिल्हा पुरवठा अधिकारी असणार असून प्रत्येक महिन्याला घेण्यात येणाऱ्या बैठकीत ग्राहकांचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहेत.

सदरील समितीत ग्राहक संघटना प्रतिनिधी





म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे प्रांताध्यक्ष डॉ विलास मोरे सेलू, मधुकर मुळे पूर्णा, अब्दुल रहीम अब्दुल करीम परभणी, गंगाधर कान्हेकर सेलू, श्याम रणेर रामपुरी खुर्द तालुका पाथरी, गुलाबराव शिंदे जिंतूर, मंचक जगताप जिंतूर, सोपान टोले गंगाखेड, भगवान करंजे पेठशिवणी, प्रतिभा वाघमारे गंगाखेड यांची तर शेतकरी प्रतिनिधी म्हणून गोपाल कच्छवे दैठना, गंगाधर देशमुख बोरी, वैद्यकीय व्यवसाय प्रतिनिधी म्हणून डॉ संदीप चव्हाण परभणी, डॉ सचिन चिद्रवार मानवत, शाळा व महाविद्यालय प्रतिनिधी म्हणून प्रा संगीता आवचार परभणी, व्यापार व उद्योग प्रतिनिधी प्रवर्गातून जनार्धन आवरगंड ताडकळस, पेट्रोल व गॅस विक्रेता प्रवर्गातून रमेश गीते जिंतूर, जिल्हा परिषद सदस्यामधून परमेश्वर निर्वळ कोल्हा व करुणा कुंडगीर गुंजगाव यांची, पंचायत समिती सदस्या मधून दिलीप काळदाते ब्राह्मणगाव, विलास गिरी पूर्णा, नपा व महापालिका सदस्यांमधून अश्विनी जाधव व रुकसाना बेगम जागीरदार परभणी, बाजार समिती सदस्यांमधून रमेश देशमुख नागापूर यांची नियुक्ती करण्यात आली असून सदरील समितीचा कार्यकाळ तीन वर्षे राहणार आहे.

# महामार्गावरील अतिक्रमण विरोधी मोहिम निव्वळ फार्स : कठोर कारवाई ऐवजी थातूर मातूर कारवाया : जिल्हाधिकाऱ्यांद्वारे कारवाईचे इशारेच

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी महानगरासह जिल्ह्यातील तालुकास्थानातून जाणाऱ्या महामार्गांवर ठिकठिकाणी वर्षानूवर्षापासून कच्ची व पक्की बेसुमार अतिक्रमणे पध्दतशीरपणे विसावली असतांना त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कठोर कारवाई अपेक्षित असतांना बांधकाम विभागासह महसुल प्रशासनाद्वारे निव्वळ थातूर-मातूर कारवाया केल्या जात आहेत.

परभणी महानगरपालिका हद्दीतून जाणाऱ्या महामार्गांवर दुतर्फा कच्ची व पक्की बेसुमार अतिक्रमणे आहेत. गंगाखेड महामार्गावर उड्डाणपुलापासून थेट ब्राह्मणगाव शिवारापर्यंतच्या सर्व्हीस रस्त्यावरसुध्दा अतिक्रमणकर्त्यांनी आपआपली अतिक्रमणे थाटली आहेत. छोटे-मोठे हॉटेल्स, पान टपऱ्या, गॅरेज, ऑटोमोबाईल्सची दुकाने वगैरे व्यवसायिकांच्या अतिक्रमणांच्या सुळसुळाटात हे सर्व्हीस रस्तेच गायब झाले आहेत. ठिकठिकाणी हे रस्ते म्हणजे या व्यवसायिकांची मशनरी किंवा वाहनांच्या पार्कींगचे ठिकाण बनले आहेत. त्यामुळेच दुचाकी वाहनधारकांना, पादचाऱ्यांना मुख्य महामार्गावरुनच धोकादायक पध्दतीने वाहतूक करावी लागत आहे. त्याचा परिणाम सातत्याने अपघात घडत आहेत.

महानगरांतर्गत जाणाऱ्या वसमत रस्त्यावर तर दुतर्फा हजारो अतिक्रमणकर्त्यांनी ठाण मांडले आहे. या अतिक्रमणकर्त्यांविरोधात कधीही कठोर कारवाई झालीच नाही, त्याचा परिणाम या रस्त्यावरील कारेगाव जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत रस्त्यालगतच्या मोकळ्या जागा अतिक्रमणकर्त्यांनी पध्दतशीरपणे हडप केल्या आहेत. त्याचे उत्तम उदाहरण शासकीय दूध डेअरी लगतच्या संरक्षण भिंतीलगत गेल्या दोन-अडीच महिन्यातच किंमान दोन डझन अतिक्रमणे स्थिरावली आहेत. खानापुर नाका, विद्यापीठ प्रवेशद्वारापासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा छोटे-मोठे फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, पाणीपुरी, चॅट भांडारचे गाडे, सेकंड हॅन्ड फर्निचर, नर्सरी, तसेच काही नामवंत कंपन्यांनीसुध्दा त्यांचे छोटे छोटे स्टॉल्स बांधकाम खात्याच्या नाल्यांवर तसेच रस्त्यावरसुध्दा थाटले आहेत. या रस्त्यावर मोठ मोठ्या व्यापारी प्रतिष्ठानांनी, हॉटेल्सधारकांनी वाहनांच्या



पार्कींगची व्यवस्था थेट रस्त्यावरच केली आहे. हॉस्पिटल्स व बँक व्यवस्थापनसुध्दा या स्पर्धेत मागे नाही. जणू काही महामार्ग म्हणजे पार्कींग स्टॅन्डच, अशी समजूत या महाभागांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील बहुतांशी उपहारगृह चालकांनी त्यांचे शेड्स पध्दतशीरपणे पुढे सरकवले आहेत. महामार्गावरील एका साईडचा पार्कींग स्टॅन्ड म्हणून वापर सुरु केला आहे. त्याचा परिणाम वसमत रस्त्यावरुन सर्वसामान्य पादचाऱ्यांसह वाहनधारकांना ये-जा करतांना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागतो आहे.

वसमत रस्त्याप्रमाणेच जिंतूर रस्त्यावरील वाहतूकीची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. उड्डाणपुलापासून जेल कॉर्नरपर्यंत अतिक्रमणकर्त्यांनी धुमाकुळ घातला आहे. दर्गा कमानीपासून ते डीएड कॉलेजच्या प्रवेशद्वारापर्यंत एका महाविद्यालयाच्या संरक्षण भिंतीलगत किमान एक-दीड डझन फळ विक्रेत्यांनी पध्दतशीरपणे बस्तान बसविले आहे. त्यांच्या विरोधात कधीही, कोणीही ओळीनेसुध्दा तक्रार करीत नाहीत. त्या फळ विक्रेत्यांना तेथून हटवून रस्ते वाहतूक सुरळीत करीत नाहीत. दर्गा कमान परिसरातील चौकातसुध्दा अतिक्रमणकर्त्यांचा वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. पुढे गणपती चौक ते विसावा तेथून पुढे जिंतूर रस्ता व पाथरी रस्त्यावरसुध्दा बांधकाम खात्याच्या नाल्यांच्या स्लॅबवर, फ टपाथवर अतिक्रमणकर्त्यांनी बस्तान बसविले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे या सर्व अतिक्रमणकर्त्यांच्या विरोधात कठोर कारवाई अपेक्षित आहे. दुर्दैवाने प्रशासनाद्वारे या संधीचासुध्दा पुरेपुर असा लाभ उठविला जात नाही. अतिक्रमणकर्त्यांना तेथून पिटाळून, मागे हटवून रस्ते वाहतूक सुरळीत केली जात नाही. थातूर-मातूर कारवाया करीत, माध्यमांमधून त्याचा गाजावाजा करीत स्वतःची पाठ थोपटवून घेण्यात अभियंत्यांसह महसूल प्रशासनांतर्गत अधिकारीही मश्गूल आहेत. त्यामुळे पाथरी, जिंतूर, गंगाखेड, वसमत हे प्रमुख रस्ते सुरळीत वाहतूकीसाठी खुली होणार नाहीत, असे विदारक चित्र निर्माण झाले आहे.

# ढोल ताशांच्या गजरात जिल्ह्यात श्री गणेशाचे आगमन

## घरोघरी विधीवत पध्दतीने गणरायाची पूजा, बाजारपेठेत मोठी गर्दी







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

श्री गणेश चतुर्थी निमित्त सोमवारी लाडक्या बाप्पाचे स्वागत जिल्हाभरात करण्यात आले. गणेशमंडळांच्यावतीने शहरातून ढोल ताशांच्या गजरात गणरायाच्या भव्य मिरवणुका काढण्यात आल्या तर घरोघरी लाडक्या बाप्पांची विधीवत पूजा करून मोठ्या थाटात गणरायाचे स्वागत करण्यात आले आहे. सकाळपासूनच गणेशमूर्ती, पूजेचे साहीत्य तसेच सजावटीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांनी बाजारपेठ फुलून गेली होती.

हिंगोली शहरातील रामलीला मैदानावर यावर्षी श्रीगणेशाच्या आकर्षक आणि विविध आकाराच्या मूर्ती विक्रीसाठी आल्या होत्या. सोमवारी सकाळपासूनच शहरातील नागरिकांनी गणेशमूर्ती खरेदीसाठी मोठी गर्दी केली होती. यावर्षी मूर्तीचे भाव वाढले असले तरीही गणेशभक्तांचा उत्साह कायम दिसत होता. सुंदर, सुबक आणि आकर्षक गणेशमूर्ती घेण्याकडे नागरिकांचा कल होता. बाजारात केळीचे खांब, दुर्वा, आघाडा, केणा, विड्याची पाने, विविध प्रकारची फळे, सजावटीसाठी लाईटींग, विविध सजावटीच्या वस्तू खरेदी करतांना नागरिक दिसत होते. यावेळी बच्चेकंपनीही मोठ्या आनंदाने लाडक्या बाप्पाला घेवून गणपती बाप्पा मोरया म्हणत गणरायाला घरी घेवून जात असतांना दिसत होते. दुसरीकडे शहरातील विविध गणेश मंडळे श्रीगणेशांच्या मूर्तीची पूजा करून वाहनांमधून गणेशांची ढोल ताशांच्या गजरात मिरणवूक काढीत असतांना दिसत होते. जिल्हाभरात श्री गणरायाचे मोठ्या थाटात आगमन झाले. घरोघरी श्री गणेशांचे स्वागत मोठ्या आनंदात करण्यात आले. यावेळी आई-वडीलांसोबत बच्चे कंपनी गणरायाला हातात घेवून जात असतांना दिसत होते. सकाळपासूनच घरोघरी श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी लगबग सुरू झाल्याची दिसत होते. श्रींच्या आगमनाने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाल्याचे दिसत आहे.

# पत्रकार गृहसंकुलासंदर्भात कार्यशाळेत मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

पत्रकार वेल्फेअर सोसायटी, हिंगोलीच्या वतीने पत्रकारांसाठी गृहसंकुल उभारणी तसेच शासनाच्या म्हाडा व प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून घरकुलाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि पुढील वाटचाल याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या कार्यशाळेचे आयोजन हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात करण्यात आले.

रविवार दि. १३ सप्टेंबर रोजी कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे उदघाटन मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून करण्यात आले.पत्रकारांना स्वतःचे हक्काचे घर उपलब्ध व्हावे, यासाठी शासनाच्या विविध गृहनिर्माण योजनांचा लाभ कसा घेता येईल, त्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, गृहसंकुल उभारणीसाठी कोणत्या बाबींची पूर्तता करावी लागते, तसेच प्रस्तावाच्या पुढील प्रक्रियेबाबत पत्रकारांना सविस्तर माहिती मिळावी, हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. कार्यशाळेस माजी आमदार गजाननराव घुगे, युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, युवा नेते शशिकांतराव वडकुते, जिल्हा माहिती कार्यालयातील मनोहर भारती यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांच्या गृहसंकुलाच्या संकल्पनेबाबत तसेच शासनाच्या उपलब्ध योजनांचा योग्य पद्धतीने लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी पत्रकारांचे सामाजिक योगदान, त्यांच्या कामातील अडचणी तसेच पत्रकारांना मूलभूत सुविधांमध्ये घराची असलेली गरज यावरही उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकारांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास गृहसंकुलाच्या प्रस्तावाला योग्य दिशा मिळू शकते, असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यशाळेचे प्रास्ताविक पत्रकार वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रकाश इंगोले यांनी केले. संदीप नागरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार वेल्फेअर सोसायटीचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेला पत्रकार बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोक न्यायालयात १३ कोटी ३४ लाखांची प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी व तालुका विधी सेवा समिती, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने न्यायीक जिल्हा हिंगोली अंतर्गत येणा-या न्यायालयामध्ये शनिवार १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकन्यायालयात प्रलंबित व दाखलपुर्व प्रकरणात एकुण तब्बल १३ कोटी ३४ लाख ९१ हजार ८८२ रुपयांची तडजोडी आधारे रक्कम ठरविण्यात आली व प्रकरणे निकाली काढण्यात आली.

या राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीकांत एल. आणेकर यांच्या हस्ते झाले. या लोकअदालतीमध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष श्रीकांत एल. आणेकर, तालुका विधी सेवा समिती हिंगोली यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा न्यायाधीश-१ एस. एन. माने-गाडेकर, जिल्हा न्यायाधीश-२ डी.जी. ढोबळे, सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर एस.जी. दुबाले, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर श्रीमती डि. व्ही. भंडारी यांनी पॅनल प्रमुख म्हणुन काम केले. दिवाणी न्यायाधीश व स्तर तथा समन्वयक व्ही.एम. मानखैर, तालुका विधी सेवा समिती, हिंगोली पी.जी. महाळंकर, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर श्रीमती. एस. डी. जायभार दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कळमनुरी हे उपस्थित होते. ॲड. एम.जे. पठाडे, ॲड. आर.बी. बांगर, ॲड. ए.ए. गायकवाड, ॲड. ए.पी. खरटमोल यांनी पॅनल विधीज्ञ म्हणून काम केले. या लोकअदालतीमध्ये सर्वांत मोठ्या रक्कमेचा धनादेश ६५ लाख रुपये लिबर्टी जनरल विमा कंपनीच्या अधिकारी श्ध्दा किनारे यांनी संबंधित पक्षकारांना तडजोडीअंती सुपुर्द केला. या लोकन्यायालयामध्ये प्रलंबीत असलेली १९ हजार ७९९ प्रकरणे तसेच विद्युत महावितरण कंपनी, विविध बँका, ग्राम पंचायत, नगरपालिका, पंचायत समिती व फायनान्स कंपनी यांची वाद दाखलपुर्व ११ हजार ४३५ प्रकरणे तडजोडीसाठी लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यामध्ये सदरील लोकअदालतीमध्ये प्रलंबित ३६५ व वाद दाखलपुर्व प्रकरणे ३१३ निकाली काढण्यात आली.



**हिंगोली- नवसाला पावणारा हिंगोली शहरातील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीची ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक शहरातून काढण्यात आली. यावेळी विश्वस्त दिलीप बांगर, शिवसेनेचे गटनेते श्रीराम बांगर यांच्यासह गणेशक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज ज्येष्ठ नागरिकांसाठी वॉकींग स्पर्धा

हिंगोली- ज्येष्ठ नागरिकांनी नियमित चालण्याचा व्यायाम करून निरोगी व आनंदी जीवन जगावे, या उद्देशाने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, यांच्या सहकार्याने जयंट्स ग्रुप, हिंगोली यांच्या पुढाकारातून मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी यामध्ये ४५ ते ७५ वयोगटातील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात त्यामुळे विशेष 'वॉकिंग स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आली असून, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी चौक असा स्पर्धेचा मार्ग राहणार आहे. ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आरोग्याच्या दृष्टीने नियमित चालण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना ट्रॉफी, तर सहभागी सर्व ज्येष्ठ नागरिकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच कार्यक्रमानंतर अल्पोपहार व फळाहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. 'स्वस्थ शरीर, सुखी जीवन' हा संदेश देत ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साह, आरोग्यविषयक जागृती आणि नियमित व्यायामाची सवय निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे जायंट्स ग्रुपचे रत्नाकर महाजन, डॉ. नामदेव कोरडे यांनी सांगितले.

### आज स्वयंसिध्दा नारीमंचतर्फे अथर्व शीर्ष पठण

हिंगोली- भक्ती, सेवा आणि संस्कार या त्रिसूत्रीवर कार्य करणाऱ्या स्वयंसिद्धा नारी मंचच्या द्वितीय वर्षानिमित्त ऋषीपंचमीनिमित्त श्री गणपती अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पवित्र आणि दिव्य कार्यक्रम सोमवार १५ सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते ८ वाजता हिंगोली शहरातील गड्डे पीर गल्ली भागातील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर, हिंगोली येथे होणार आहे. एकत्र येऊया, अथर्वशीर्ष पठण करूया आणि श्री गणरायाच्या कृपेने जीवन मंगलमय करूया या संकल्पनेतून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या मंगल प्रसंगी सर्व महिला भक्तजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामूहिक अथर्वशीर्ष पठणात सहभागी व्हावे आणि श्री गणरायाचे आशीर्वाद प्राप्त करावेत असे आवाहन स्वयंसिद्धा नारी मंचच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी सर्व महिला भाविकांनी सकाळी ६ वाजून ४५ मिनिटांपर्यंत उपस्थित राहणे आवश्यक आहे. उपस्थित राहणाऱ्या महिलांनी केशरी रंगाची साडी परिधान करून यावे अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

### उबाठा शिवसेनेचे जिल्हा कचेरीसमोर आंदोलन

हिंगोली- विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांच्या नेतृत्वात येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हिंगोलीचा विकास, तुमसे ना हो पायेगा या घोषवाक्याखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी आंबादास दानवे यांनी महायुती सरकारवर जोरदार टिका केली. तसेच जिल्ह्यातील रखडलेली विकास कामे तत्काळ पूर्ण करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. या आंदोलनात जिल्हाप्रमुख अजय पाटील, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, शेतकरी सेनाप्रदेश संघटक वसीम देशमुख, उपजिल्हाप्रमुख गणेश शिंदे, हिंगोली विधानसभा प्रमुख परमेश्वर मांडगे, डॉ रमेश शिंदे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, तालुकाप्रमुख, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोली पालिकेच्यावतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सव स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

हिंगोली पालिकेच्यावतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत शहरातील नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्वच्छ हिंगोली उपक्रमांतर्गत ही स्पर्धा घेतली जात असल्याची माहीती पालिकेने दिली आहे.

हिंगोली पालिकेच्यावतीने शहरात पर्यावरणपूरक पध्दतीने गणेशोत्सव साजरा करणे हा या स्पर्धेचा उद्देश असून याद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली जाणार आहे. या स्पर्धेत केवळ हिंगोली शहरातील नागरिक आणि कुटुंबेच सहभागी होऊ शकतील. गणेशोत्सव पूर्णपणे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा करावा, यासाठी गणेशमूर्ती पर्यावरणपूरक, नैसर्गिक व शाश्वत साधनांपासून तयार केलेली असावी आणि तिला नैसर्गिक रंगांचाच वापर केलेला असावा असे स्पष्ट करण्यात आले आहे. या स्पर्धेत सजावटीसाठी प्लास्टीक व थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळला पाहीजे. याशिवाय निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करणे बंधनकारक आहे. मूर्ती विसर्जनासाठी घरगुती विसर्जन किंवा नगर पालिकेच्या कृत्रिम विसर्जन तलावाचा वापर करणे अपेक्षित आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी त्यांच्याकडील पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची छायाचित्रे व आवश्यक माहीती निर्धारीत पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांचे परीक्षण समितीमार्फत गुणांकन पध्दतीने करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य असून दि १४ ते १८ सप्टेंबरपर्यंत तारीख निश्चित करण्यात आली आहे.

स्पर्धेमध्ये विजेत्या ठरणाऱ्या प्रथम तीन क्रमांकांच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव सजावट किंवा उपक्रमांना आकर्षक रोख बक्षीसे दिली जाणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव-स्वच्छ व सुंदर हिंगोली या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन हिंगोली नगर पालिकेच्या नगराध्यक्षा सौ. रेखा श्रीराम बांगर, उपनगराध्यक्ष माबुद बागवान, मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांनी केले आहे. या स्पर्धेला हिंगोलीकर चांगला प्रतिसाद देतील अशी अपेक्षा नगर पालिकेला आहे.

# धनगर समाजाच्या महामोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित रहा- शशीकांत वडकुते

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**



धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी सुरू केलेल्या मुक्तिसंग्राम लढ्याला १७ सप्टेंबर रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून शासनाला वचनाची आठवण करून देण्यासाठी व आरक्षणाच्या मागणीसाठी परभणी येथे भव्य 'महामोर्चा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्च्यात हिंगोली जिल्ह्यातील सर्व समाजबांधवांनी ताकतीने सहभागी व्हावे, असे आवाहन धनगर समाजाचे युवक नेते शशिकांत रामराव वडकुते यांनी केले आहे.

परभणी येथील महामोर्च्याच्या नियोजन व पूर्वतयारीसाठी हिंगोली येथे जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील महत्त्वाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शासनाला वचनाची आठवण करून देणारा लढा**

गेल्या कित्येक पिढ्यांपासून धनगर समाज एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने लढा देत आहे. १ वर्षापूर्वी सुरू केलेल्या या लढ्यादरम्यान शासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्यामुळे समाजात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आपल्या लेकराबाळांच्या कल्याणासाठी आणि हक्काच्या आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा इशारा या वेळी देण्यात आला.

**महाराष्ट्रात धनगरांची परभणी सिद्ध करणार**

बैठकीत बोलताना शशिकांत वडकुते म्हणाले, जगात जर्मनी, भारतात परभणी आणि जगात जर्मनी या म्हणीनुसार १७ सप्टेंबर रोजी 'महाराष्ट्रात धनगर आणि धनगरांची परभणी' हे या भव्य मोर्च्याच्या माध्यमातून सिद्ध होईल. हा महामोर्चा सरकारच्या उरात धडकी भरवणारा ठरेल. परभणीतून पेटलेली आरक्षणाच्या क्रांतीची ज्वाला संपूर्ण महाराष्ट्रात वनव्यासारखी पसरेल.

हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक गावातून व तालुक्यातून धनगर बांधवांनी १७ सप्टेंबर रोजी मोठ्या संख्येने परभणीकडे कुच करावे, असे आवाहन बैठकीच्या शेवटी करण्यात आले.

# श्री सद्गुरू सेवा गणेश मंडळाच्यावतीने १२ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

शहरातील गवळीपुरा येथील जीवन कला मंदिरात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री सद्गुरु सेवा गणेश मंडळ व पूर्णवाद युवा फोरम, हिंगोली यांच्या वतीने गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे.

जय पूर्णवादच्या जयघोषात श्रींची स्थापना दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी सोमवारी दुपारी ५ वाजता मंत्र जागराने करण्यात आली.

या उत्सवानिमित्त १४ ते २५ सप्टेंबर दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ऋषीपंचमी निमित्त ज्येष्ठ पूजन, गुरुवार पूजन, गजानन रत्नपारखी यांचा अभिनव अभंगाचा कार्यक्रम, सामुहिक अथर्वशीर्ष पठण, पुणे येथील रामनाथ बुवा अय्यर यांची कीर्तन सेवा आणि सामुदायिक गुरुवार पूजन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. दि. २५ सप्टेंबर शुक्रवारी दुपारी ४ वाजता श्रींचे विसर्जन होणार आहे. गणेशोत्सवात १४ सप्टेंबर -स्थापना व मंत्र जागर (दु. ५ वा.), १५ सप्टेंबर- ज्येष्ठ पूजन - श्री व सौ. सुधाकरराव रत्नपारखी (सायं. ७ वा.), १७ सप्टेंबर -गुरुवार पूजन (सायं. ६ वा.), १९ सप्टेंबर-अभिनव अभंग- गायक गजानन रत्नपारखी (सायं. ७ वा.), २० सप्टेंबर - श्री गणपती अथर्वशीर्ष पठण (स. १० वा.), २१ सप्टेंबर-कीर्तन सेवा-रामनाथ बुवा अय्यर, पुणे (सायं. ७ वा.), ४ सप्टेंबर - सामुदायिक गुरुवार पूजन (सायं. ६.३० वा.), २५ सप्टेंबर - श्रींचे विसर्जन (दु. ४ वा.) होणार आहे. सर्व कार्यक्रम जीवन कला मंदिर, गवळीपुरा, हिंगोली येथे होतील. तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सद्गुरु सेवा गणेश मंडळ व पूर्णवाद युवा फोरमच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजप जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांचा वाढदिवस साध्या पध्दतीने साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांचा वाढदिवस यंदा अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. सध्या राज्यासह हिंगोली जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी मोठ्या अडचणींचा सामना करत आहे. या पार्श्वभूमीवर वाढदिवसानिमित्त कोणतेही मोठे कार्यक्रम, जल्लोष अथवा अनावश्यक खर्चाचे आयोजन न करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरवर्षीप्रमाणे वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन न करता कार्यकर्ते, पदाधिकारी व हितचिंतकांनी प्रत्यक्ष शुभेच्छा देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. भाजपा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनीही कार्यकर्त्यांना वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. साधेपणा, सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता जपत साजरा झालेला हा वाढदिवस कार्यकर्त्यांमध्येही चर्चेचा विषय ठरला.










नांदेड- ढोल-ताशांच्या गजरात व उत्साहपूर्ण वातावरणात घरोघरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळामध्ये गणरायांचे उत्साहात आगमन झाले.गणरायांच्या आगमन मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती. (छाया- नरेंद्र गडप्पा, नांदेड)

# वाहनांना 'ब्रेक'; गणेशभक्तांच्या खरेदीला 'ग्रीन सिग्नल'!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १४ सप्टेंबर -**

गणरायाच्या आगमनासाठी शहर सज्ज झाले असताना गणेशभक्तांच्या उत्साहाला वाहतूक कोंडीचा अडथळा येऊ नये, यासाठी देगलूर पोलिसांनी यंदा नियोजनबद्ध पाऊल उचलले आहे. गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर मागील पंधरा दिवसांपासून विविध ठिकाणी शांतता बैठका घेऊन उत्सवाच्या नियोजनाची तयारी करण्यात आली. त्यानंतर आज मुख्य बाजारपेठेतील प्रमुख मार्गांवर वाहनप्रवेश बंद करून पोलिसांनी 'वाहनांना ब्रेक आणि भक्तांच्या खरेदीला मोकळी वाट' उपलब्ध करून दिली.

पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांच्या नेतृत्वाखाली हे वाहतूक नियोजन करण्यात आले. गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशमूर्ती, पूजेचे साहित्य, सजावटीच्या वस्तू आणि इतर आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी तालुक्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक देगलूरच्या मुख्य बाजारपेठेत दाखल होतात. ही संभाव्य गर्दी लक्षात घेऊन बाजारपेठेतील प्रमुख प्रवेशमार्गांवर बॅरिकेड्स लावून चारचाकी व दुचाकी वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले.

विशेष म्हणजे, केवळ रस्ते बंद करून पोलीस प्रशासन थांबले नाही, तर प्रमुख ठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करून वाहतूक व्यवस्थेवर प्रत्यक्ष लक्ष ठेवण्यात आले. त्यामुळे बाजारपेठेच्या मध्यवर्ती भागात वाहनांची अनावश्यक गर्दी होण्यास आळा बसला आणि गणेशभक्तांना पायी फिरून खरेदी करणे अधिक सुलभ झाले.

**वाहनांना ब्रेक; बाजारपेठेला मोकळा श्वास!**

सणासुदीच्या काळात देगलूरच्या मुख्य बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. त्यात



वाहनांची भर पडल्यास अरुंद रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण होऊन व्यापारी, ग्राहक आणि गणेशभक्तांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. यंदा ही परिस्थिती टाळण्यासाठी पोलिसांनी वाहनांपेक्षा नागरिकांच्या सुरक्षित आणि सुरळीत हालचालीला प्राधान्य दिल्याचे दिसून आले. प्रमुख रस्त्यांवर वाहनबंदी केल्यामुळे बाजारपेठेतील अनावश्यक वाहतूक कमी झाली. परिणामी गणेशभक्तांना गर्दीतून वाट काढण्याची कसरत न करता गणरायाच्या स्वागतासाठी आवश्यक साहित्याची खरेदी तुलनेने मोकळ्या आणि शिस्तबद्ध वातावरणात करता आली.

**पंधरा दिवसांच्या शांतता बैठकीनंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी**

गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी देगलूर पोलिसांनी मागील पंधरा दिवसांपासून विविध स्तरांवर शांतता बैठका घेतल्या. गणेश मंडळांचे पदाधिकारी, नागरिक आणि संबंधित घटकांशी संवाद साधून उत्सवातील शिस्त, शांतता, सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेबाबत नियोजन करण्यात आले.

याच नियोजनाचा भाग म्हणून गणेश चतुर्थीच्या दिवशी मुख्य बाजारपेठेतील प्रमुख रस्त्यांवर वाहनप्रवेश नियंत्रित करण्यात आला. उत्सवाच्या काळात केवळ बंदोबस्त न करता नागरिकांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सोयीचे वातावरण उपलब्ध करून देण्याच्या पोलिसांच्या भूमिकेचे हे सकारात्मक उदाहरण ठरले आहे. गणरायाच्या आगमनासाठी बाजारपेठेत वाढणारी गर्दी, व्यापाऱ्यांची वर्दळ आणि भाविकांची संख्या लक्षात घेता देगलूर पोलिसांनी केलेल्या या वाहतूक नियोजनामुळे वाहतूक कोंडीपासून गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळाला असून, गणरायाच्या स्वागताचा उत्साह अधिक मोकळ्या वातावरणात अनुभवता आला.

# मुदखेडच्या 'लालबागच्या राजा'चे ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात आगमन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ सप्टेंबर -**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुदखेड शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेश मंडळ, मराठा गल्लीच्या गणरायाचे सोमवारी ढोल-ताशांच्या गजरात व उत्साहपूर्ण वातावरणात भव्य आगमन झाले. मंडळाच्या गणरायाला 'मुदखेडचा लालबागचा राजा' अशी ओळख मिळाल्याने बाप्पाच्या आगमनाकडे शहरवासीयांचे विशेष लक्ष लागले होते. गणरायाच्या दर्शनासाठी आणि आगमन मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती.

मंडळाच्या वतीने गणरायाच्या आगमन सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली होती. साई मंदिर, रामनगर येथून गणरायाच्या आगमन मिरवणुकीला सुरुवात झाली. ढोल-ताशांचा गजर, गणेशभक्तांचा उत्साह आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. मिरवणूक अंडरब्रिज, बसवेश्वर चौक, स्वामी समर्थ मंदिर, कलेजी माता मंदिर मार्गे मराठा गल्ली येथे पोहोचली. मार्गातील विविध ठिकाणी नागरिकांनी गणरायाचे उत्साहात स्वागत केले.



आगमन मिरवणुकीत मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने गणेशभक्त सहभागी झाले होते. तरुणांचा उत्साह विशेष पाहायला मिळाला. पारंपरिक ढोल-ताशांच्या तालावर गणेशभक्तांनी जल्लोष करत बाप्पाचे स्वागत केले.

सामाजिक उपक्रमांची परंपरा

श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळात धार्मिक कार्यक्रमांसोबतच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाकडून विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. मंडळाच्या या सामाजिक कार्याची दखल महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात घेण्यात आली असून, मंडळाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावल्याचे सांगण्यात आले. मंडळाच्या सामाजिक कार्याला मिळालेली ही दखल पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात यंदाही विविध धार्मिक, सामाजिक व समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याने शहरवासीयांमध्ये उत्सुकता आहे.

गणरायाच्या आगमन सोहळ्याचे नियोजन मंडळाचे अध्यक्ष विनोद वाघमारे, उपाध्यक्ष विकास शिंदे, कोषाध्यक्ष संदीप गायकवाड आणि सचिव अनुप कोलगणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आगमन सोहळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




## आ. चिखलीकरांच्या निवासस्थानी ढोल-ताशांच्या गजरात गणरायाचे आगमन

**नांदेड -** 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी श्री गणरायाचे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. भक्तिमय वातावरणात श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली.यावेळी आ. चिखलीकर कुटुंबीयांनी विधिवत पूजा-अर्चा करून गणरायाचे दर्शन घेतले. 'बाप्पा, यंदा शेतकऱ्यांवर आलेले संकट दूर कर. त्यांच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदू दे, पिकांना भरघोस उत्पन्न मिळू दे आणि त्यांच्या कष्टाला सुख-समाधानाची फळे मिळू दे,' अशी मनोभावे प्रार्थना करीत गणरायाच्या चरणी साकडे घालण्यात आले. पावसाच्या लहरीपणामुळे आणि पिकांच्या नुकसानीमुळे चिंतेत असलेल्या शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी, त्यांच्या कुटुंबात आनंद नांदावा आणि सर्वांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात, अशी भावना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यावेळी आली. गणरायाची प्रतिष्ठापना करण्यासाठी यावेळी पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक रोहन निलय, आमदार बालाजीराव कल्याणकर,आमदार आनंदराव बोंढारकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाशराव घाटे, माजी आमदार सुभाषराव साबणे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, भारतीय जनता पार्टी प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी केशव घोणसे पाटील, कालिदास जहागीरदार, धर्मराज देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव सावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, नागनाथराव घिसेवाड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे नगरसेवक साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव सुनील नानवटे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, श्रीधर नागपूरकर, डॉ.उत्तमराव सोनकांबळे, संजय अंभोरे, शिवकुमार देशमुख, प्रल्हादराव उमाटे, उपेंद्रसिंघ शाहू, रोहन कांबळे यांच्यासह परिवारातील सौ प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ.प्रमोद पाटील चिखलीकर संदीप पाटील चिखलीकर, प्रविण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## रामसिंग चव्हाण यांचे निधन

**बाऱ्हाळी** -मौजे वसूर तांडा येथील ज्येष्ठ नागरिक रामसिंग कुणा चव्हाण ( वय ८०) यांचे सोमवारी (दि. १४) सकाळी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी नऊ वाजता मौजे वसूर तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मोहनावती पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा सहशिक्षक अशोक चव्हाण यांचे ते वडील होत.

# 'भन्नाट रानवारा' या गीताचा सोशल मिडियावर धुमाकूळ

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १४ सप्टेंबर -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील मराठी चित्रपट संगीतकार प्रा.संदीप भुरे यांनी संगीतबद्ध केलेला 'भन्नाट रानवारा' हे गीत अल्पावधीतच सोशल मिडियावर धुमाकूळ घालत आहे.सध्या काही गाजलेली आणि नामांकित जुनी गाणी नव्या रूपात पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येताना दिसत आहेत.याच पार्श्वभूमीवर 'भन्नाट रानवारा' हे लोकप्रिय गाणं नुकतंच धस प्रोडक्शनने टी-सीरिजच्या माध्यमातून नव्या अंदाजात प्रेक्षकांच्या भेटीला आणलं आहे. या गाण्यात स्नेहा धस आणि पवन गावंड यांनी अप्रतिम अभिनय केला असून, विवेक नायर आणि सोनाली सोनवणे यांनी आपल्या सुमधुर मधाळ




आवाजात गाण्याला सुरेल स्वर दिले आहेत. गाण्याचे शब्द राहूल काळे यांनी लिहिले असून संदीप भुरे यांनी संगीतबद्ध केले आहे. या गाण्याचे दिग्दर्शक रवी धस हे आहेत.विशेष म्हणजे,ऐन पावसाळ्यात या गाण्याचं शूटिंग करण्यात आलं आहे. त्यामुळे पावसाळ्यातील निसर्गसौंदर्य, हिरवाई आणि प्रेमभावना यांचा सुंदर मिलाफ या गाण्यात पाहायला मिळतो. निसर्गाचं प्रेम आणि सौंदर्य या गाण्यामध्ये तितक्याच प्रेमाने पाहायला मिळेल.सन २००२ मध्ये सुरेश वाडकर आणि उत्तरा केळकर यांच्या सुमधुर आवाजात हे गाणं प्रदर्शित झालं होतं. त्याच मूळ भावनेला साजेसं आणि नव्या पिढीच्या पसंतीला उतरेल अशा स्वरूपात हे गाणं पुन्हा एकदा नव्याने सादर करण्यात आलं आहे.या नव्या गाण्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम द्यावं, गाण्यावर मोठ्या प्रमाणात रील्स बनवाव्यात आणि कोलॅब करावं, असे आवाहन मराठी चित्रपट संगीतकार प्रा.संदीप भुरे यांनी प्रेक्षकांना केले आहे.

# मोबाइल व्यसनाधिनते संदर्भात जनजागृती



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

आसरा नगर येथील आयुष्मान आरोग्यवर्धिनी केंद्रात १२ सप्टेंबर रोजी बालके व पालकांसाठी 'मोबाइल व्यसनाधीनता' या विषयावर विशेष सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. उमेश आत्राम उपस्थित होते. त्यांनी मोबाइलच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम, मुलांना मोबाइलपासून दूर ठेवण्याचे मार्ग आणि नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करावा, यावर पालकांना मार्गदर्शन केले. तसेचे डॉ. मुंगल, डॉ. सुरेखा मुंगल आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. रीठे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री आढाव, विलास गाडे, मोहम्मद सय्यद, नागेश पारवे, प्रमिला राऊत यांच्यासह सुकेशनी वने, माधवी रेड्डी, लता वीरभद्रे, निर्मलाताई नरवाडे आदी उपस्थित होते.

# जवळा दे. येथे चिमुकल्यांनी साकारला एआय गणपती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

एआय गणपतीची स्थापना ही आधुनिक तंत्रज्ञान आणि आपली परंपरा यांचा एक अप्रतिम मेळ आहे. सध्याच्या डिजिटल युगात बाप्पाचे स्वागत करण्यासाठी ही एक अत्यंत नाविन्यपूर्ण आणि



आकर्षक संकल्पना आहे. जवळा (दे) या छोट्याशा गावात यंदा गणेशोत्सवाने वेगळंच रूप घेतलं आहे. गावच्या काही बालगोपाळांनी एकत्र येत आपापल्या मोबाईलवर साकारलेला 'एआय बाल गणेश' आणि त्यावरचा चमकणारा 'एआय मखर' सध्या संपूर्ण गावात चर्चेचा विषय ठरला आहे. दररोज होणारी आरतीही बाल गणेश मंडळाच्या सदस्यांनी एकाच वेळी एकत्र बसून ऑनलाईन पद्धतीने म्हणायची आहे. गणेशोत्सवानिमित्ताने होणारा सर्वच खर्च टाळण्यात आल्याने या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत व कौतुक होत आहे.

# विश्वनाथराव कोलमकर यांचा अमृत महोत्सव उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

येथील सौभद्र मंगल कार्यालयात विश्वनाथराव हासेन्ना कोलमकर यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त अमृत महोत्सव सोहळा रविवारी (दि. १३ सप्टेंबर) उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रांतील मान्यवर, समाजबांधव, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कोलमकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक बालाजी पाटील खतगावकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत, महापुरुष व महाराजांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर




आयोजकांच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष बालाजी पाटील खतगावकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बालाजी पाटील खतगावकर तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'विश्वनाथराव कोलमकर अमृत महोत्सव-२०२६' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या विशेषांकातून कोलमकर यांच्या जीवनप्रवासासह सामाजिक, शैक्षणिक व समाजहिताच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास दैनिक लोकमंथनचे संपादक अशोकराव सोनवणे, प्राचार्य अडकिने, गिरगावकर, रंगनाथरावजी सूर्यवंशी, व्यंकटराव पाटील खतगावकर, सोमनाथराव सेठ दिंडोरिकर, श्याम शेठ, राजे, संतोष पाषाणकर, नागनाथराव कुंभार, बळवंतराव कुंभार, विनायकराव राऊत, निलेश राऊत, सुधाकर तहाडे, अशोक वाडेकर, नरहरी आवनुरे, विजय देवडे लहानकर, ॲड. संजय रुईकर, एस.जी. माचणवार, व्यंकटराव पार्डीकर, नागोराव पाटील दांडेगावकर, ह.भ.प. राम महाराज पांगरेकर, अशोकराव तहाडे, देविदास चिलवंतकर, शिवाजी पांगरेकर, प्रा. प्रभाकर बाबुळगावकर, महेश कानगुडे, जयप्रकाश कानगुले, गणेश राजे नायगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच रमेश देवडे, कपिल कानगुले, लक्ष्मण विभुते, दत्ताहरी कानगुले, प्रा. डॉ. नागोराव आवडे, संजय राजे, लक्ष्मण शिरोळे, धोंडीबा गोत्रे, चंद्रकांत कापशीकर, साईनाथ मिरदोडे, हनुमंत बुकमारीकर, प्रकाश आडवे, प्रा. बालाजीराव आडवे, संतोषराव कानगुले, चंद्रकांत कोलमकर, गजानन कोलमकर, गणेश आंबेकर, हनुमान गोरडवार, संदीप आवनुरे, ॲड. सखाराम शिलकंठे, ॲड. माधव मर्कंटवाड, विलास राजे नायगाव, प्रा. पांचाळ, राजू नायगावकर, नामदेव कोलमकर, सतीश कानगुले, संभाजी भोमनाळीकर, माधव राजुरे, नागपूरे महाराज, विठ्ठल कोकलेगावकर, मारुती कानगुले, बालाजी लाडेगावकर, साईनाथ शिरोळे, हनुमंत पाशावार, शिवम कानगुले, निखिल कुंभार, रोहित कानगुले यांच्यासह कुंभार समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विश्वनाथराव कोलमकर यांना ७५व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत निरोगी, दीर्घायुषी आणि आनंदी जीवनासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. मान्यवरांच्या उपस्थितीने आणि समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागाने अमृत महोत्सव सोहळ्याला विशेष रंगत आली.